# लेखी आश्वासनानंतर 'वंचित'चे आंदोलन स्थगित

**जनता आवाज वृत्तसेवा**

**जामखेड :** श्री निखिल कन्स्ट्रक्शन प्रायव्हेट लिमिटेड कंपनीने शेतकऱ्याची फसवणूक केल्याप्रकरणी वंचित बहुजन आघाडीच्या वतीने जामखेड तहसील कार्यालयासमोर अमरण उपोषण करण्यात आले. वंचित बहुजन आघाडीचे राज्य प्रवक्ते ड. डॉ. अरुण जाधव यांच्या नेतृत्वाखाली व तालुकाध्यक्ष आतिश पारवे यांच्या उपस्थितीत आंदोलन पार पडले.

श्री निखिल कन्स्ट्रक्शन प्रायव्हेट लिमिटेड व दोषींवर कठोर कारवाई करावी, मुरूमाचे पैसे वसूल करून शेतात माती टाकावी, अशी जोरदार मागणी आंदोलन कार्यकर्त्यांनी केली.

यावेळी बापूसाहेब ओव्हळ, उमा जाधव, शेख समीर, नासिर सय्यद, नय्युम सुभेदार, त्रिंबक कुमटकर, प्राचार्य विकी घायतडक, प्रा. कुंडल राळेभात, ड. हर्षल डोके, ड. महारूद्र नागरगोजे, ड. प्रविण ससाणे, सर्जेराव गंगावणे बापूसाहेब कार्ले, केदार रसाळ, किशोर ससाणे, सचिन भिंगारदिवे, सदाशिव हजारे, संतोष चव्हाण, मच्छिंद्र जाधव, अरविंद जाधव, संतोष पवार, नंदकुमार खरात, नंदकुमार आव्हाड, भोसले अविनाश, सुर्यकांत सदाफुले, सोहेल काझी, संतोष शेगर, आप्पासाहेब निगुडे यांच्यासह शेतकरी व ग्रामस्थ उपस्थित होते.




### शेतकऱ्याला न्याय दिला जाईल : तहसीलदार

आंदोलनाची दखल घेत तहसीलदार गणेश माळी यांनी उपोषणस्थळी येऊन आंदोलनकर्त्यांची भेट घेतली. योग्य ती कायदेशीर कारवाई केली जाईल व शेतकऱ्याला न्याय मिळवून दिला जाईल, असे लेखी आश्वासन दिल्यानंतर आंदोलन तात्पुरते स्थगित करण्यात आले.

# स्व. अरुणकाकांचे विचार कार्यकर्त्यांच्या माध्यमातून जिवंत

## सचिन जगताप; जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने शिक्षक परिषदेचे जिल्हाध्यक्ष तथा माध्यमिक शिक्षक सोसायटीचे संचालक बाबासाहेब बोडखे व उपक्रमशील शिक्षिका रेणुका बोडखे यांनी नगर तालुक्यातील पारगाव मौला येथील जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप केले.

तर माजी आमदार स्व. अरुणकाका जगताप यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ शाळेच्या आवारात मोठ्या प्रमाणात वृक्षांची लागवड करण्यात आली.

गुणे आयुर्वेद शास्त्र सेवा मंडळाचे अध्यक्ष सचिन जगताप यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कार्यक्रमाप्रसंगी श्री विशाल गणपती देवस्थानचे विश्वस्त प्रा. माणिक विधाते, प्रा. सुनील पंडित, महेंद्र हिंगे, शरद दळवी, बबन शिंदे, माजी सभापती अभिलाष घिगे, संतोष म्हस्के, दादासाहेब दरेकर, दीपक आरडे, दीपक शिरसाट, प्रसाद सामलेटी, आनंद भंडारी, वैभव बोठे, नाथा खेडकर, अमोल खेडकर, गोपीनाथ बोठे, हनुमंत बोठे, श्रीधर बोठे, भाऊ पांडुळे आदी उपस्थित होते.

बाबासाहेब बोडखे म्हणाले की, ज्या शाळेत प्राथमिक शिक्षण पूर्ण करून पायावर उभे राहिलो आणि ज्यांनी जीवनात उभे करण्याचे काम केले ते माजी आमदार कै. अरुणकाका जगताप यांच्या स्मरणार्थ त्यांच्या प्रेरणेने विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याची मदत देऊन शालेय परिसरात झाडे लावण्यात आली. स्व. जगताप यांनी सर्वसामान्यांना जवळ करुन त्यांना उभे करण्याचे काम केल्याचे त्यांनी सांगितले.

जिल्हा परिषद शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना स्कूल बॅगसह, वॉटर बॉटल, वही, पेन, कंपास आदी सर्व शैक्षणिक साहित्य असलेल्या संचचे वाटप सचिन जगताप यांच्या हस्ते करण्यात आले. उपस्थित मान्यवरांनी देखील आपल्या मनोगतामध्ये स्व. अरुणकाकांच्या आठवणींना उजाळा दिला.



स्व. अरुणकाकांनी प्रत्येकाशी निर्माण केलेल्या जिव्हाळ्याच्या संबंधामुळे ते सर्वांना कुटुंबातील सदस्या प्रमाणे प्रिय बनले. माणसे जोडून त्यांना आधार देण्याचे काम त्यांनी केले. तर सर्व समाजाला बरोबर घेऊन त्यांनी काम केले. बाबासाहेब बोडखे हे देखील जगताप कुटुंबाचा एक भाग आहे. लहानपणी त्यांनी माझ्यासह भाऊ-बहीणींना शिक्षणाचे धडे दिले. काकांनी त्यांना दिलेला आधार ते कधीही विसरलेले नाही.

**– सचिन जगताप**

# जवानांची सायकल वारी पांडुरंगाच्या भेटीला

## विरपत्नी सोनाली शिंदेंनी सायकल वारीला दाखविला झेंडा

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीगोंदा :** श्रीगोंदा म्हटलं की, मेहनती किसान आणि बहादुर जवान आणि संत शेख महंमद महाराज यांची भुमी. या भुमीतील शहीद जवानांना मानवंदना देणेसाठी श्रीगोंदा तालुका सायकल असोसिएशन व शहीद जवान स्मारक समितीचे जवानांनी शहीद जवान निघाले पांडुरंग भेटीला' हा दिव्यसंदेश घेऊन श्रीगोंदा ते पंढरपूर सिंदुर ऐक्य सायकल वारीचे आयोजन केले.

या सायकल वारीचे श्रीगोंदा येथील संत शेख महंमद महाराज मंदीर परिसरात झालेल्या प्रस्थानप्रसंगी सायकल वारीस वीरपत्नी सोनाली शिंदे यांच्या हस्ते झेंडा दाखविण्यात आला.

यावेळी स्व. सायक्लिस्ट डॉ. संजय काळे व दिलीप वाबळे यांना श्रध्दांजली वाहण्यात आली. या सायकल वारीचे पळसदेव येथे संजय शेलार, भुषण काळे इंदापुर येथे मरकड कुस्ती प्रशिक्षण केंद्रात मारुती मरकड कैलास गवळी यांनी स्वागत केले.

श्रीगोंदा येथील हरिओम योग ग्रुपने इंदापुर येथे योगाचे प्रशिक्षण दिले. अग्नीपंख फौंडेशनच्या वतीने श्रावणबाळ आश्रमातील विद्यार्थ्यांना दपतर व वह्यांचे वाटप करण्यात आले.वारीचे नियोजन नवनाथ खामकर, नवनाथ दरेकर, संतोष सांगळे, रमेश सांळुके, ड. संपत इधाते, सुभाष ठोकळ व संतोष जाधव यांनी केले.



श्रीगोंदा तालुक्यातील १६ जवान शहीद झाले आहेत. त्यांच्या पवित्र आत्म्यांची स्मृती घेऊन शहीद जवान व पांडुरंग भेटीच्या सायकल वारीची श्रीगोंदा तालुका सायकल असोसिएशन व शहीद जवान स्मारक समितीचे जवानांनी मशाल पेटविली आहे.

**– नवनाथ खामकर**

# विद्यार्थ्यांनी केली गुणवत्ता सिध्द

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** राष्ट्रीय टेस्टिंग एजन्सीद्वारे घेतल्या जाणाऱ्या नीट, जेईई व सीईटी परीक्षेचा निकाल जाहीर झाला आहे. या परीक्षेमध्ये अहमदनगर एज्युकेशन सोसायटी व रजत अकॅडमी (पुणे) यांच्यामार्फत चालवल्या जाणाऱ्या अकॅडमीतील विद्यार्थ्यांनी उत्तुंग यश संपादन केले आहे.

नीट परीक्षेमध्ये इफ्राफातेमा फारुख शेख हिने ४६६ गुण मिळवून ती ऑल इंडिया रँक मध्ये पीडब्ल्यूबीडी प्रवर्गामध्ये ९० वी आली आहे. तसेच सार्थक सचिन कुलकर्णी याने ४५३ व अपाला सुनिल कुलकर्णी हिने ४१८ गुण मिळवले आहेत.

# 'अल्ट्राटेक-आर्किटेक्ट'कडून योग दिन उत्साहात साजरा

## शारीरिक सदृधतेसाठी योगासने आवश्यक : अग्रवाल

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** स्थिरम सुखम आसनम या श्लोकाप्रमाने जास्त जोरजोरात व्यायामा प्रमाणे वर्क आऊट न करता योगासनांच्या प्रत्येक स्थिती मध्ये आवश्यक तेवढा वेळ थांबणे गरजेचे आहे. मनावर नियंत्रण आणायचे असेल तर श्वासावर नियंत्रण मिळवणे गरजेचे असून त्यासाठी नियमित प्राणायाम करणे आवश्यक असल्याचे प्रमिला अग्रवाल यांनी सांगितले.

आर्किटेक्ट इंजिनीअर्स अँड सर्व्हेअर्स असो आणि अल्ट्राटेक सिमेंट कंपनी यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक योग दिनाचे औचित्य साधून संस्था सभासद आणि कुटुंबीयांसाठी योग शिबिर प्रात्यक्षिक आणि व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते.

यासाठी योग शिक्षिका प्रमिला अग्रवाल यांनी मार्गदर्शन केले. या उपक्रमास अल्ट्राटेक सिमेंटचे मार्केटिंग ऑफिसर पराग जोशी, प्रविण काकडे, एसा सचिव अभिजीत देवी, जितेश सचदेव, भुषण पांडव, यश शहा, सुनिल औटी, अनिल साळुंके आदी अधिकारी उपस्थित होते.

यावेळी सुनिल महाजन व गायत्री जोशी यांनी योगगीत सादर केले त्यास अजित माने यांनी कोरस दिला. तर मधुकर बालटे यांनी योगावर छान कविता सादर केली तर संस्था सभासद श्वेता मुळे यांची कन्या राजवी मुळे हिने उत्कृष्ट योगासने सादर केली. राजवी ही अवघ्या सात वर्षाची असून नाशिक मध्ये जिल्हा क्रीडा विभाग, मराठा विद्या प्रसारक समाज तसेच नाशिक महापालिका यांनी योग दिनानिमित्त तिला खास आमंत्रित केले होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रदिप तांदळे यांनी केले. तर प्रशांत जाधव आणि सचिव अभिजित देवी यांनी उपस्थितांचे स्वागत केले आणि पराग जोशी यांनी आभार मानले.



### हजारो साधकांना शिकवला योग

योग शिक्षिका प्रमिला अग्रवाल यांनी एम. ए. योग शास्त्रमध्ये शिक्षण पुर्ण केले असून त्या त्रिगुण योगा सेंटर अंतर्गत प्राणायाम, फेस योगा, उंची वाढीचे वर्ग, पाठ दुखी साठी, वेगवेगळ्या व्याधींवरील वर्ग, गरोदर महिलांसाठी नियमित योग वर्ग घेतात. त्यांनी आत्तापर्यंत दहा हजारापेक्षा जास्त साधकांना योग शिकवला आहे.

# आश्रमशाळेतील भौतिक सोईसुविधा सोडवा

## मुख्याध्यापक संघाची प्रकल्प अधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे मागणी

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अकोले :** महाराष्ट्र राज्य मुख्याध्यापक संघ यांच्या वतिने एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय राजुर अंतर्गत चालवण्यात येणाऱ्या शासकीय आश्रम शाळेतील विविध समस्यांबाबत प्रकल्प अधिकारी देवकन्या बोकडे यांना निवेदन देऊन प्रत्येक विषयावर चर्चा करण्यात आली

याप्रसंगी सहायक प्रकल्प अधिकारी मनोजकुमार पैठणकर, लेखाधिकारी संजय सोनवणे आदी उपस्थित होते. यावेळी आश्रमशाळेतील समस्यांबाबत तात्काळ प्रश्न सोडविणेबाबत मुख्याध्यापक संघाला आश्वासीत करण्यात आले.

रिक्त अधिक्षक, अधिक्षिका पद भरावे, आश्रम शाळेवरील बहुउद्देशीय पदे तात्काळ भरणे, राजूर प्रकल्पांतर्गत करण्यात आलेल्या प्रतिनियुक्ती रद्द करून सदर कर्मचाऱ्यांस मुळ आस्थापनेवर हजर करणे, निवासी एक ते चार वर्गातील विद्यार्थ्यांच्या आंघोळ व कपडे धुण्यासाठी केअर टेकर नेमणे, प्रलंबित देयके मंजुर करणे, शाळा सशक्तीकरणासाठी शाळा व्यवस्थापन समितीला आवश्यक निधी मिळावा, मजुरी तत्त्वावर रिक्त पदावर स्थानिक पातळीवर मनुष्यबळ उपलब्ध करण्यास परवानगी द्यावी, आश्रमशाळेत भौतिक सोईसुविधांबाबत प्राधान्यक्रमाने सोडवणूक व्हावी आदी प्रश्नांवर चर्चा करण्यात आली.

यावेळी मुख्याध्यापक संघाचे जिल्हाध्यक्ष शिवराज कदम, आदिनाथ सुतार, सचिव शिरसाठ, शिवाजी नरके, विष्णु नेहे, राम मयेकर, पंडित कदम, नवनाथ गायकवाड, शिवनाथ खेडकर, चंदन बडवे, किशोर शिंदे, मनियार, शेख यांसह विविध आश्रम शाळांचे मुख्याध्यापक हजर होते.




# वडाळा महादेव पायी दिंडीचे ठिकठिकाणी स्वागत

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीरामपूर :** तालुक्यातील वडाळा महादेव येथील श्री त्रंबकेश्वर देवस्थान पायी दिंडी सोहळ्याचे सकाळी दहा वाजता मान्यवरांच्या हस्ते विधीवत पुजन करून प्रस्थान करण्यात आले. तसेच इच्छामनी कार्यालय या ठिकाणी राऊत परिवार यांचे वतीने स्वागत करण्यात आले.

हभप जंजाळे महाराज म्हणाले की, बालसंस्कार केंद्र तसेच वृक्षारोपण काळाची गरज आहे. यावेळी कल्पना वाघुंडे, मिनाक्षी देसाई, सविता देसाई, पुष्पा त्रिभुवन, शुभम नामेकर, राजेंद्र रासने, दत्तात्रय खिलारी, बन्सी शिंदे, पुंडलिक खैरनार, भानुदास महाराज खरात, सुभाष भालेराव आदी या दिंडी सोहळ्यासाठी प्रयत्नशील होते.

# शिक्षक-शिक्षकेत्तरांना वैद्यकीयसह पुरवणी देयके द्या

## मुख्याध्यापक शिक्षक शिक्षकेत्तर समन्वय समितीची मागणी

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे थकीत वैद्यकीय व पुरवणी देयके तातडीने मिळावे व मार्च २०२५ पूर्वीच्या भविष्य निर्वाह निधीच्या पावत्या मिळण्याची मागणी मुख्याध्यापक शिक्षक शिक्षकेतर समन्वय समितीच्या वतीने करण्यात आली आहे. या मागणीसाठी संघटनेच्या शिष्टमंडळाने वेतन पथक अधीक्षक रामदास म्हस्के यांची भेट घेऊन निवेदन दिले.

याप्रसंगी मुख्याध्यापक संघाचे सचिव प्राचार्य संभाजी पवार, शिक्षकेतर संघटनेचे पुणे विभागीय सचिव गोवर्धन पांडुळे, शिक्षक नेते वैभव सांगळे, संभाजी बेलोटे, विनोद सोनसळे, भाऊसाहेब भडांगे, गवळी, ए.जी. आचार्य आदी उपस्थित होते. शिक्षक आमदार किशोर दराडे यांनी वेतन पथक अधीक्षक म्हस्के यांच्याशी फोनवर सदर प्रश्नासंदर्भात चर्चा करुन प्रश्न सोडविण्याच्या सूचना केल्या. यावेळी म्हस्के यांनी वैद्यकीय बिलांचे टॅब तातडीने सुरू करण्याचे तसेच थकीत बिलासाठी देखील टॅब सुरू करुन देण्याचे आश्वासन दिले.

जिल्ह्यातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी त्यांच्या स्वतःचे तसेच कुटुंबातील सदस्यांचे आजारपणासाठी केलेल्या खर्चाचे वैद्यकीय प्रतिपूर्ती देयके १५ मार्च २०२५ पासून शिक्षण संचालकांच्या आदेशान्वये थांबविण्यात आलेले आहेत. तथापि जून महिना संपत आला असतानाही शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना वैद्यकीय प्रतिपूर्ती देयके अदा करण्यात आलेले नाही.जिल्ह्यातील शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची भविष्य निर्वाणी निधी ना परतावा आग्रीम रक्कम मिळण्यास विलंब होत आहे.



# पाथर्डी तालुक्यात चोरट्यांचा सुळसुळाट?

## तीन ठिकाणी चोरीच्या घटना; दोन लाखांचा मुद्देमाल लंपास

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पाथर्डी :** पाथर्डी शहर व तालुक्यात २३ जून ते २४ या दोन दिवसात तीन वेगवेगळ्या ठिकाणी झालेल्या चोरीच्या घटनांनी नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. संगणक इन्स्टिट्यूट फोडून साहित्य चोरी, बँकेबाहेर रोकड हिसकावणे आणि घरफोडी अशा प्रकारांमुळे पोलीस प्रशासनालाही तपासाचे आव्हान उभे राहिले आहे.

पाथर्डी शहरातील नाथनगर येथील विठ्ठल शंकर बडे (वय ६४) यांच्या विठ्ठल कॉम्प्युटर टायपिंग सेंटरचे कुलूप तोडून चोरट्यांनी आत प्रवेश करत ५४,६५० रुपये किमतीचे सिपीयू, मिनी सिपीयू, ऑल इन वन कॉम्प्युटर, सीसीटीव्ही कॅमेरे, एलसीडी स्क्रीन, किबोर्ड, माउस आदी साहित्य चोरून नेले. ही घटना २४ जून रोजी सकाळी उघडकीस आली. दुसरी चोरीची घटना भर दुपारी मिरी गावात घडली आहे. दि. २४ जून रोजी दुपारी १.३० वाजण्याच्या सुमारास पाथर्डी तालुक्यातील शिंगवे केशव येथील संगीता बलभीम ससे (वय ४८) या पतीसह तालुक्यातील मिरी येथून इंडियन ओव्हरसीज बँक शाखेतून १,१९,००० रुपये रोख काढून दुचाकीवरून जात असताना बँकेबाहेर थांबलेल्या दोन अनोळखी दुचाकीस्वाराने त्यांच्या हातातील पिशवी हिसकावून घेतली. पिशवीत रोख रक्कम, पासबुक आणि आधारकार्ड चोरटे पसार झाले.

तर तिसरी चोरीचा प्रकार काळेवाडी (मोहोज देवढे) ता. पाथर्डी येथे २४ जून रोजी मध्यरात्री घडली आहे.गोरक्ष अण्णा पाताळे (वय ३५) यांच्या घराच्या पाठीमागील भिंतीतील विटा काढून चोरट्यांनी घरात प्रवेश करत वीस हजार रुपये रोख व दहा हजार रुपये किमतीचा मोबाईल चोरून नेला. चोरट्यांनी लोखंडी पेटी आणि रोकड असलेला डबा शेतात फेकून दिला. तिन्ही घटनांतील चोरी गेलेल्या वस्तू व रोकड मिळून एकूण अंदाजे २ लाख रुपयांचा मुद्देमाल चोरट्यांनी लंपास केला असून, तिन्ही गुन्हे पाथर्डी पोलिस ठाण्यात दाखल करण्यात आले आहे.

# नगरपालिकेत सत्ता आल्यास विकासाचा वेग दुप्पट होणार

## आ. खताळ; ट्रकटर्मिनलच्या कामाची आ. खताळ यांच्याकडून पाहणी

**जनता आवाज वृत्तसेवा**

**संगमनेर :** नगरपरिषदेच्या निवडणुकीत महायुतीचा भगवा फडकवायचा आहे. नगरपालिकेत महायुतीची सत्ता आल्यानंतर संगमनेर शहराछटा विकासाचा वेग दुप्पट होईल, असा विश्वास आ. अमोल खताळ यांनी व्यक्त केला आहे.

संगमनेर नगरपालिकेच्या वतीने पंचायत समिती जवळील गुंजाळ नगर परिसरात ट्रक टर्मिनल उभारण्यात येत आहे. या टर्मिनलच्या कामाची पाहणी आ. खताळ यांनी केली.

आ. खताळ म्हणाले की, संगमनेर नगरपालिकेमध्ये महायुतीचा नगराध्यक्ष व नगरसेवक बसेल तेव्हाच शहराच्या विकासाचा वेग दुप्पट होईल. संगमनेर शहराच्या विविध प्रभागामध्ये काही समस्या आहे त्या दूर करण्यासाठी आपण प्रयत्नशील आहोत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, अजित पवार, पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात निधी येणार आहे आणि या निधीतून शहरात गेल्या चाळीस वर्षापासून खुंटलेला विकास पूर्ण करण्यासाठी आम्ही कटिबद्ध राहू. संगमनेरच्या जनतेन नगरपालिका निवडणुकीत महायुतीच्या सोबत रहावे, असे आवाहन त्यांनी केले.

यावेळी मुख्याधिकारी रामदास कोकरे, अधीक्षक राजेश गुंजाळ, दिनेश फटांगरे, विनोद सूर्यवंशी रामभाऊ राहाणे, पायल ताजने, ज्ञानेश्वर कर्पे, जावेद जहागीरदार, शौकत जहागीरदार, रोहित चौधरी, सौरभ देशमुख, कैलास कासार, शिवम गुंजाळ, लालू गुंजाळ, सचिन शहाणे, हेमंत गाडेकर, निखिल धुमसे, विलास घुले, अवधूत साबळे, निखिल गाडेकर, सौरव गुंजाळ, आदित्य नवले, यश गुंजाळ अनिल गुंजाळ, प्रदीप राजपूत, प्रवीण गुंजाळ आदीसह कार्यकर्ते उपस्थित होते.



### ट्रक टर्मिनलचे काम दर्जेदार करा : आ. खताळ

ट्रक टर्मिनलचे काम चार ते पाच महिन्यात पूर्ण करण्यात येईल. परंतु, हे काम चांगले दर्जेदार झाले पाहिजे आणि ट्रकचालक व क्लीनर यांना चांगल्या सोयी सुविधा उपलब्ध करून द्याव्यात. मोफत दिल्याचे कुठले महत्त्व राहत नाही आणि यातून वादावादी वाढतील, म्हणून नगरपालिका ट्रक चालकांकडून यासाठी नाममात्र शुल्क आकारले जाईल.

**– अमोल खताळ, आमदार**

# श्रीगोंद्यात अवैध जुगार अड्डयावर पोलिसांचा छापा

## २२ जणांना केली अटक; ३८ लाखांचा मुद्देमाल केला हस्तगत

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीगोंदा :** तालुक्यातील सोनवणे वस्ती येथे अवैध जुगार अड्ड्यावर विशेष पोलिस पथकाने छापा टाकून ३७ लाख ५८ हजार ३०० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला. याप्रकरणी स्वप्नील राजू खेत्रे यांच्यासह २२ जणांना अटक करण्यात आली. तर दोघे फरार झाले. परिविक्षाधीन पोलीस उपअधीक्षक संतोष खाडे यांच्या नेतृत्वात ही कारवाई झाली. पोलिस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्या आदेशानुसार अवैध धंद्यांविरुद्ध कारवाईसाठी विशेष पथक स्थापन करण्यात आले.

२४ जून रोजी श्रीगोंदा पोलीस स्टेशन हद्दीत पेट्रोलिंगदरम्यान खाडे यांना गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, स्वप्नील खेत्रे हा सोनवणे वस्तीजवळ हेमंत कोथिंबिरे यांच्या शेडमध्ये तिरट जुगार खेळवतो. पथकाने पंचांसह छापा टाकला असता अनेकजण पत्ते आणि पैशांसह जुगार खेळताना आढळले. पोलिसांना पाहताच काही जण पळाले, परंतु २२ जणांना ताब्यात घेण्यात आले.

दरम्यान, पकडलेल्यांच्या अंगझडतीत २ लाख २२ हजार ८०० रुपये रोख, ५ लाख ९६ हजार ००० रुपये किमतीचे २० मोबाईल आणि २८ लाख ९० हजार रुपये किमतीची ९ वाहने जप्त केली. याप्रकरणी श्रीगोंदा पोलीस स्टेशनात महाराष्ट्र जुगार कायदा कलम ४, ५ अन्वये गुन्हा नोंदवला गेला. फरार दिपक मखरे आणि हेमंत कोथिंबिरे यांचा शोध सुरू आहे.

### हॉटेल कृष्णावरही टाकला छापा

जामखेड पोलीस स्टेशन हद्दीत नगर-जामखेड रोडवरील हॉटेल कृष्णा येथे अवैध दारूविक्रीप्रकरणी तुकाराम रामराव डोले (वय ४२, रा. सारोळा) याला अटक करण्यात आली. त्याच्याकडून १९ हजार रुपये किमतीचा विदेशी दारू आणि बिअरचा साठा जप्त करण्यात आला. जामखेड पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल करण्यात आला.



# दिव्यांग बांधवांच्या ठेवींवर जादा व्याज

## थोरात अमृतवाहिनी बँकेचा नाविन्यपूर्ण निर्णय

**जनता आवाज वृत्तसेवा**

**संगमनेर :** सामाजिक बांधिलकी जोपासणाऱ्या सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात अमृतवाहिनी सहकारी बँकेचे संचालक मंडळाने दिव्यांग बांधवांना त्यांचे ठेव रकमेवर पाव टक्का अधिक व्याज देण्याचा निर्णय घेतला असल्याची माहिती बँकेचे चेअरमन सुधाकर जोशी यांनी दिली.

राज्याचे माजी महसूलमंत्री लोकनेते आदरणीय बाळासाहेब थोरात यांचे मार्गदर्शन आणि नेतृत्वाखाली बँक सक्षमपणे वाटचाल करत आहे. १००० कोटी रुपयांचे आसपास व्यवसाय असणाऱ्या सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात अमृतवाहिनी बँकेने सदैव ग्राहकाभिमुख विविध योजना राबविल्या आहेत. या सर्व योजनांना उत्कृष्ट प्रतिसाद लाभल्याने संचालक मंडळाने ग्राहक हित साधण्यासाठी दिव्यांग बांधवांसाठी ही अनोखी ठेव व्याज दर वाढ योजना आणली आहे. अहिल्यानगर जिल्ह्यात प्रथमच दिव्यांग बांधवांसाठी निर्णय घेणारी सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात अमृतवाहिनी बँक ठरली आहे.

बँकेने नुकतीच नाविन्यपूर्ण अशी दैनंदिन ठेव योजना सुरू केलेली आहे. ज्यामध्ये दैनिक ठेव प्रतिनिधी ग्राहकांकडे गेल्यानंतर व पैसे जमा केल्यानंतर ग्राहकाचे खात्यावर त्वरित पैसे जमा करण्याची सोय करण्यात आलेली आहे.

# उंबरेकर बाबांच्या दिंडीचे पंढरपूरकडे प्रस्थान

## ‘राम कृष्ण हरीच्या’ जय घोषणांनी परिसर दुमदुमला

**जनता आवाज वृत्तसेवा**

**करंजी :** पाथर्डी तालुक्यातील श्रीक्षेत्र वृद्धेश्वर येथुन सद्गुरु रघुनाथ महाराज उंबरेकर, गुरुवर्य पंढरीनाथ महाराज उंबरेकर यांच्या कृपाशीर्वादाने व भागवत महाराज उंबरेकर यांच्या मार्गदर्शनाखाली आदिनाथ सेवा मंडळाने प्रारंभ केलेली श्रीक्षेत्र वृद्धेश्वर ते श्रीक्षेत्र पंढरपूर पायी दिंडी बुधवार दि. २५ जून रोजी ‘राम कृष्ण हरीच्या’ जय घोषात वृद्धेश्वर इथून सावरगावघाट मार्गे पंढरपूरकडे मार्गस्थ झाली.

### हे दिंडीचे रौप्यमहोत्सवी वर्ष

गेल्या २४ वर्षापासून रघुनाथ महाराज, पंढरीनाथ महाराज उंबरेकर यांच्या आशीर्वादाने श्रीक्षेत्र वृद्धेश्वर ते श्रीक्षेत्र पंढरपूर पायी दिंडी सोहळा आयोजित केला जातो. यावर्षी दिंडीचे रौप्यमहोत्सव वर्ष असल्या कारणाने रथाचे सारथी म्हणून बैल जोडीला मान दिला आहे. श्रीक्षेत्र वृद्धेश्वर ते श्रीक्षेत्र पंढरपूर पर्यंत राम कृष्ण हरीचा जयघोष करत दिंडी पंढरपूरमध्ये दाखल होते. अशी माहिती दिंडी चालक भागवत महाराज उंबरेकर यांनी दिली.



गेल्या २४ वर्षापासून हा दिंडी सोहळा भक्तिमय वातावरणामध्ये आयोजित केला जात असुन पाथर्डी तालुक्या बरोबरच आष्टी राहुरी तालुक्यातील अनेक वारकरी या दिंडी सोहळ्यामध्ये सहभागी होतात.

यावर्षी दिंडीचे रौप्य महोत्सव वर्ष असल्या कारणाने आदिनाथ सेवा मंडळाने वारकऱ्यांच्या इच्छाखातर रथाला बैल जोडीची साथ देण्याचा निर्णय घेतला असून घाटदेऊळगाव येथील दादासाहेब भवर या शेतकऱ्याच्या बैल जोडीला हा मान मिळाला आहे.

### अल्पवयिन मुलीचे खंडाळ्यातून अपहरण

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीरामपूर :** अल्पवयीन मुलीचे अपहरण केल्याची घटना घटना खंडाळा परिसरात घडली आहे. या प्रकरणी तरूणाविरोधात शहर पोलिसात अपहरणाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबतची अधिक माहिती अशी की, सदर सुमारे १७ वर्षे वयाची मुलगी ही सकाळी वडीलांना म्हणाली की, मी मोटारसायकल घेवून गावातून चक्कर मारून येते. तेव्हा सदर मुलीने वडीलांची मोटारसायकल घेवून ती गावात गेली. परंतू, बराचवेळ झाला तरी ती घरी आली नाही. त्यामुळे घरच्यांनी खंडाळा गावात तिचा शोध घेतला परंतु, ती सापडली नाही.

# तिसगाव येथे गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

## ना. राधाकृष्ण विखे पा. यांच्या वाढदिवसाचे औचित्य

**जनता आवाज वृत्तसेवा**

**राहाता :** जलसंपदा मंत्री तथा पालकमंत्री नामदार डॉ. राधाकृष्ण विखे पाटील,यांच्या वाढदिवसानिमित्त तिसगाव येथे सर्वरोग निदान व चिकित्सा शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. हा कार्यक्रम धनश्रीताई विखे पाटील यांच्या शुभहस्ते पार पडला. गावकऱ्यांच्या वतीने सौ. विखे यांचा सत्कार देखील करण्यात आला.

तिसगाव येथील संतोष ज्ञानदेव कडू व ग्रामपंचायत सदस्य योगिता संतोष कडू यांच्याकडून पहिली ते दहावी या वर्गातील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार व शालेय मुलांना वही वाटप या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार आणि शालेय मुलांना वही वाटप धनश्री विखे यांच्या शुभहस्ते करण्यात आले.



यावेळी बोलताना विखे म्हणाल्या की, चिमुकल्यांसाठी एक आदर्श म्हणुन आपल्या स्वतः च्या वाढदिवसाला देखील असेच उपक्रम घेतले पाहिजे. यावेळी प्रवरा माध्यमिक विद्यालयाचे व जिल्हा परिषद शाळेचे सर्व शिक्षक कर्मचारी, अंगणवाडी सेविका, महिला बचत गट तसेच प्रवरा कारखान्याचे माजी चेअरमन अण्णासाहेब कडू, संचालक विजय कडू, संजय नालकर, तिसगावचे सरपंच नानासाहेब डोंगरे, उपसरपंच उर्मिलाताई रांधवणे, माजी सरपंच भास्करराव घुले, प्रकाश नरोडे, प्रभाकर नरोडे, बंडूआप्पा कडू, गंगाधर घुले, डॉ. विक्रम नालकर, बबन रांधवणे, सोमनाथ कडू, सोपान डोंगरे, अजित घुले, मंदा रांधवणे, अनिता रांधवणे, सुप्रिया कडू, योगिता कडू तसेच अनेक मान्यवरांसह महिला भगिनी देखील मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

# पाथर्डीत पर्यावरण दिंडीचे स्वागत

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पाथर्डी :** पाऊले चालती पंढरीची वाट‘‘ ही आषाढी एकादशीनिमित्त काढण्यात येणारी विशेष व्यसनमुक्ती आणि पर्यावरणपूरक दिंडीचे पाथर्डीत जोरदार स्वागत मंगळवारी करण्यात आले. दि. २१ जून ला छत्रपती संभाजीनगर येथील एन-६ सिडकोमधील हनुमान मंदिरातून ‘झाडे लावा, झाडे जगवा’ आणि ‘व्यसनमुक्त जीवन, निरोगी जीवन’ हा संदेश घेऊन पंढरपूरकडे हि दिंडी मार्गस्थ झाली आहे.




या दिंडीमध्ये सरपंच अशोक भिंगारे पाटील, जगदीश पाटील खैरनार, तुकाराम पाटील चव्हाण, गोविंद ढव्हाण, संतोष भोजने, भागवत सुरवाडे, भगवानदास पवार, विठ्ठल वैरागड, वेदांत कोतकर, प्रणव चिखले पाटील आदींसह मोठ्या संख्येने वारकऱ्यांचा सहभाग आहे.

विशेष म्हणजे, या दिंडीचे आयोजन छत्रपती संभाजीनगर पोलिस दलातील कर्मचारी आणि पाथर्डी तालुक्याचे सुपुत्र बाळासाहेब राठोड हे गेल्या दहा वर्षांपासून करीत आहेत.

पाथर्डी शहरात दिंडी पोहोचताच बर्ड संस्थेचे समन्वयक डॉ. दीपक देशमुख, शिरीष जोशी, नवनाथ चव्हाण, संजय सुडके आणि भाऊसाहेब शिरसाट यांनी दिंडीचे स्वागत केले.

# विद्यार्थ्यांना खेळामध्ये प्रशिक्षकाची नितांत गरज

## आ. जगताप; संपत बारस्करांच्या प्रयत्नातून फुटबॉल ॲकॅडमीचे उद्घाटन



खेळाच्या माध्यमातून आपले आरोग्य सुदृढ व निरोगी राहण्यास मदत होत असते. पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी वृक्षारोपण व संवर्धनाची गरज आहे. विद्यार्थ्यांना देखील बालवयातच वृक्षाबद्दल प्रेम निर्माण व्हावे, यासाठी त्यांच्या हस्ते वृक्षारोपण केले आहे. आ. संग्राम जगताप यांनी प्रभागाच्या सर्वांगीण विकासासाठी मोठा निधी उपलब्ध करून दिला असल्यामुळे हा परिसर विकसित म्हणून ओळखला जात आहे.

**- संपत बारस्कर, राष्ट्रवादीचे शहर जिल्हाध्यक्ष**

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शहर जिल्हाध्यक्ष संपत बारस्कर यांनी प्र. क्रमांक १ मध्ये फुटबॉल खेळासाठी मैदान निर्माण करून दिले आहे. विद्यार्थ्यांना खेळामध्ये घडवण्यासाठी चांगल्या सुविधा व प्रशिक्षकाची खरी गरज असते असे प्रतिपादन आमदार संग्राम जगताप यांनी केले.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शहर जिल्हाध्यक्ष संपत बारस्कर यांच्या प्रयत्नातून कॉटेज कॉर्नर येथे संघर्ष प्रतिष्ठान फुटबॉल ॲकॅडमीचे उद्घाटन आ. संग्राम जगताप यांच्या हस्ते संपन्न झाले.

यावेळी माजी नगरसेवक डॉ. सागर बोरुडे, किरण बारस्कर, सुहास करंडे, महेश गलांडे, मयूर टेमक, शशी गायकवाड, संदीप दरंदले, घनश्याम सानप, धीरज लोणारे आदी उपस्थित होते. आ. जगताप म्हणाले की, विद्यार्थ्यांना बालवयातच शिक्षणाबरोबर खेळाचे चांगले प्रशिक्षण मिळणे गरजेचे आहे. आता क्रीडा स्पर्धेमध्ये देखील करिअर करण्याच्या विविध संधी उपलब्ध आहे, तरी विद्यार्थ्यांनी आपल्या आवडीच्या खेळामध्ये करियर बनवण्यासाठी ध्येय निश्चित करून जिद्द, चिकाटी व मेहनतीच्या जोरावर यश संपादन करावे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शहर जिल्हाध्यक्ष संपत बारस्कर म्हणाले की, प्रभागाच्या सर्वांगीण विकासाबरोबर विद्यार्थ्यांना बाल वयातच खेळण्यासाठी मैदानी उपलब्ध करून देणे गरजेचे आहे. म्हणून कॉटेज कॉर्नर परिसरात फुटबॉल मैदानाची निर्मिती केली आहे, जगामध्ये सर्वात जास्त फुटबॉल हा खेळ खेळला जातो आणि तो लोकप्रिय देखील आहे.

# मिरीच्या उपसरपंचपदी अनिता गुंड बिनविरोध

**जनता आवाज वृत्तसेवा**

**करंजी :** पाथर्डी तालुक्यातील राजकीयदृष्ट्या महत्त्वपूर्ण समजल्या जाणाऱ्या मिरी ग्रामपंचायतवर पंचायत समिती सदस्य राहुल गवळी यांच्या गटाची एक हाती सत्ता असून संजय शिंदे यांचा उपसरपंचपदाचा कार्यकाळ पूर्ण झाल्यानंतर काल ग्रामपंचायत कार्यालयात उपसरपंचपदासाठी अनिता विजय गुंड यांची बिनविरोध निवड करण्यात आली.

### सरपंच अनिता, उपसरपंचही अनिताच

मिरी गावच्या सरपंचपदी अनिता गवळी कारभार पहात असतांना त्यांच्या सोबतीला उपसरपंच म्हणून आणखी एका अनिताची वर्णी लागल्याने सरपंच उपसरपंचपदावर विराजमान झालेल्या दोन अनिता गावचा कारभार पाहणार असून विकास कामाच्या दृष्टीने कमी चेंडूत जास्त धावा काढण्याची जबाबदारी या दोघींवर श्रेष्ठींनी टाकली आहे.

सरपंच अनिता गवळी यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या या उपसरपंच पदाच्या निवडी प्रसंगी माजी सरपंच सुनंदा गवळी, सेवा संस्थेचे अध्यक्ष विजयराव जाधव, विष्णु सोलाट, शिवसेना नेते एकनाथ झाडे, अशोकराव गवळी, अशोकराव घोंगडे, राजेंद्र वाघ, जालिंदर गवळी, संजय जाधव, आसाराम वीर, शिवाजी गवळी, बापुराव झाडे, विजय मिरपगार, गणेश मोटे, अनिल दाणे, बाबासाहेब दारकुंडे, डॉ. जाधव, ग्रामविकास अधिकारी राजेंद्र साखरे यांच्यासह प्रमुख पदाधिकारी व कार्यकर्ते यावेळी उपस्थित होते.



पंचायत समिती सदस्य राहुल गवळी यांच्या नेतृत्वाखाली मिरी ग्रामपंचायतचा कारभार विकासभिमुख करण्यात आला सर्वांना सोबत घेऊन गावचा पारदर्शक कारभार करण्याची भूमिका प्रामाणिकपणे निभावत असल्याचे समाधान सरपंच अनिता गवळी, उपसरपंच अनिता गुंड यांनी व्यक्त केले.

### आदिवासी भागात दुधाळ जनावरांचा तुटवडा

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अकोले :** आदिवासी भागात दुधाळ जनावरे वाटप करण्याची मागणी अकोले तालुक्यातील युवक अध्यक्ष विजय पवार यांनी केले आहे. अकोले तालुक्यात अनेक आदिवासी कुटुंब आहेत जे नेहमी रोजगारासाठी स्थलांतर करतात. , तालुक्यात रोजगार नसल्याने अनेक आदिवासी बांधव जुन्नर नारायणगाव भागात रोजगारासाठी जात असतात. यासाठी स्थानिक लोकांना रोजगार उपलब्ध करणे आवश्यक आहे.

# बेर्डी येथील विद्यार्थ्याची शिष्यवृत्ती फी हडप?

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कर्जत :** तालुक्यातील बेर्डी येथे असणाऱ्या सिद्धिविनायक पॉलिटेक्निक कॉलेज या ठिकाणी विद्यार्थ्यांची येणारी शिष्यवृत्ती विद्यार्थ्यांना न देता त्यांच्याकडून कोरे धनादेश घेऊन त्यांची शिष्यवृत्ती हडप करण्यात येत आहे, अशा पद्धतीने विद्यार्थ्यांची लूट करणाऱ्या सिद्धिविनायक पॉलिटेक्निक कॉलेजच्या विरोधात कारवाई करण्यात यावी अन्यथा आंदोलन करण्याचा इशारा बहुजन समाज पार्टीचे तालुका प्रभारी दत्तात्रय सोनवणे यांनी दिला असून तसे निवेदन त्यांनी निवासी जिल्हाधिकारी दादासाहेब गीते यांना दिले आहे.

बहुजन समाज पार्टीचे तालुका प्रभारी दत्तात्रय सोनवणे यांनी पत्रकार परिषद घेऊन कर्जत येथे माहिती दिली की, या कॉलेजमध्ये शिक्षण घेणाऱ्या कार्तिक नाना खुडे हा विद्यार्थी सिव्हिल इंजिनिअर या डिप्लोमा कोर्स करता २०२३ - २४ यावर्षी त्याने प्रवेश घेतला. एस. सी. कॅटेगिरी मधील हा विद्यार्थी असूनही त्याच्याकडून पहिल्या वर्षी दहा हजार रुपयांची फी रोख स्वरूपामध्ये कॉलेजने घेतली आहे. यानंतर या विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती पहिल्या वर्षी २८ हजार २० रुपये ही विद्यार्थ्याला मिळाले असता महाविद्यालयाचे प्राचार्य यांनी ती शिष्यवृत्तीची सर्व रक्कम खात्यावरून काढून शाळेत जमा करा, असे सांगितले, त्यानुसार खुडे यांनी २८ हजार वीस रुपये कॉलेजमध्ये भरले. सदरचा प्रकार दुसऱ्या वर्षीही घडला. तिसऱ्या वर्षीची शिष्यवृत्ती जमा होणार आहे, तरी कोरे चेक आपण आणून द्या, तेव्हाच तुमचे कागदपत्रे देऊ तोपर्यंत कागदपत्रे देणार नाही, असे सांगितले. चेक न दिल्यामुळे अद्यापपर्यंत कागदपत्रे विद्यार्थी कार्तिक खुडे यास प्राचार्य यांनी दिले नाही.

यानंतर हे सर्व प्रकरण या विद्यार्थ्यांनी बहुजन समाज पार्टीचे तालुका प्रभारी दत्तात्रय सोनवणे यांना सांगितले असता त्यांनी जिल्हाधिकारी अहिल्यानगर तसेच राज्याचे शिक्षण मंत्री, कर्जत तालुका गटशिक्षणाधिकारी यासह विविध अधिकाऱ्यांना लेखी निवेदन देवून आंदोलनाचा इशारा दिला आहे.

# आणीबाणी बंदिवान चित्रप्रदर्शनास उत्स्फूर्त प्रतिसाद

## प्रदर्शन सर्वांसाठी खुले; आणीबाणी लागून झाली ५० वर्ष पूर्ण

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** आणीबाणी लागू होऊन ५० वर्ष पूर्ण झाल्याच्या निमित्ताने जिल्हा प्रशासन व जिल्हा माहिती कार्यालयाच्यावतीने आयोजित चित्र प्रदर्शनाचे उद्घाटन निवासी उपजिल्हाधिकारी दादासाहेब गीते यांच्या हस्ते करण्यात आले. जिल्हाधिकारी कार्यालयातील तळमजल्यावर आयोजित या प्रदर्शनास आणीबाणी बंदिवान, त्यांचे नातेवाईक व नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

देशात २५ जून १९७५ रोजी आणीबाणी लागू करण्यात आली होती. या घटनेला २५ जून २०२५ रोजी ५० वर्ष पूर्ण झाली. त्यानिमित्ताने जिल्ह्यातील आणीबाणी बंदिवानांच्या कार्याला उजाळा देण्यासाठी सचित्र प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. या प्रदर्शनात आणीबाणीच्या अनुषंगाने जिल्ह्यात घडलेल्या विविध घटना-घडामोडींची तसेच आणीबाणीविरोधी संघर्षात सहभागी झालेल्या विविध कार्यकर्ते-नागरिकांची छायाचित्रे व माहितीचा समावेश करण्यात आला होता. जिल्ह्यात सध्या आणीबाणी बंदिवान व त्यांच्या पत्नी अशा एकूण १३३ जणांना शासनाकडून मानधन दिले जात आहे. यापैकी ४५ जणांकडून उपलब्ध माहिती या प्रदर्शनात मांडण्यात आली होती. आणीबाणीच्या काळात जिल्ह्यातील अनेक बंदिवासी १ महिन्यापासून ते १९ महिन्यापर्यंतच्या कारावास भोगला. या सर्व बंदिवासांच्या कार्याला प्रदर्शनातील विविध फ्लेक्स, बोर्ड व स्टँडी यांच्या माध्यमातून उजाळा देण्यात आला होता. प्रदर्शनाच्या उद्घाटनप्रसंगी हेरंब आवटी, रविंद्र कुलकणी, अविनाश आपटे, सुरेश बब, सुभाष कोते, बाबूराव पुरोहीत, विजयराव जोशी असे अनेक ज्येष्ठ स्वयंसेवक उपस्थति होते. प्रभारी जिल्हा माहिती अधिकारी सुरेश पाटील यांनी या प्रदर्शनाच्या संकल्पनेपासून प्रत्यक्ष मांडणीपर्यंतचे सविस्तर विवेचन उपस्थित मान्यवरांना दिले.

### लोकसहभागासाठी खुले निमंत्रण

या प्रदर्शनाला शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थी, अभ्यासक, संशोधक, सामाजिक कार्यकर्ते आणि सामान्य नागरिकांनी मोठ्या संख्येने भेट द्यावी, असे आवाहन जिल्हा प्रशासन व माहिती विभागातर्फे करण्यात आले आहे. प्रदर्शन सर्वांसाठी खुले असून पुढील काही दिवस खुले राहणार आहे.



# संपादकीय

## अमेरिकेने वाढवलेल्या युद्धज्वराचे परिणाम

अखेर अमेरिकेने इराणवर जोरदार हल्ला करत इस्रायल- इराण युध्दात उडी घेतली. इराणतर्फे अमेरिकेला चोख उत्तर देण्याची भाषा करण्यात आली. येत्या काळात हे युध्द चांगलेच भडकू शकते. या चिघळत्या संघर्षाचा भारतावर काय परिणाम होऊ शकतो आणि जगासाठी त्याचा अर्थ काय याची चर्चा एव्हाना सुरु झाली आहे. इराणचे चाबहार बंदर भारत विकसित करत आहेत. व्यूहात्मकदृष्ट्या भारताला इस्त्रायलपेक्षा इराण महत्त्वाचा आहे. इराणने रुपयात कच्चे तेल आपल्याला पुरवले. अनेकदा तो उधारीत इंधन पुरवतो. त्याचबरोबर इराण भारताच्या बाजूने भूमिका घेतो. मध्य पूर्वेत जाण्यासाठी इराणच्या चाबहार बंदराचा आणि तिथल्या लोहमार्गाचा भारताला चांगला फायदा होणार आहे. असे असताना इस्त्रायलकडून काही लष्करी सामुग्री आपण आयात करतो, एवढ्या एकाच कारणासाठी भारताने या युद्धाच्या वेळी ‘नरो वा कुंजरो वा’ वा भूमिका घेतली. भारताची ही भूमिका काही आर्थिक फायदे लक्षात घेऊन घेतली गेली असे म्हणावे, तर तशीही परिस्थिती नाही. भारताला या युद्धात समेट घडवण्याची संधी होती; परंतु ही युद्धाची वेळ नाही, असे सांगण्यावरच आपण समाधान मानले. या वेळी आगळिक इस्त्रायलने केली असून, अमेरिकेच्या पाठिंब्यावर त्याची मध्य पूर्वेत कुरघोडी सुरू आहे. इराणला अण्वस्त्र आणि अणुबाँबपासून परावृत्त करण्याऐवजी इराणमध्ये सत्तांतर करण्यात इस्त्रायलला जास्त रस दिसतो. नेतान्याहू यांनी घोषणा केली आहे, की इस्रायल इराणच्या अणुकार्यक्रमाला कमकुवत करण्यासाठी आणि त्याच्या सैन्याचा नाश करण्यासाठी जितके दिवस लागतील तितके दिवस कदाचित अनेक आठवडे हल्ले करत राहील. इस्रायलने इराणवर ड्रोन आणि बॅलिस्टिक क्षेपणास्त्रे डागली आहेत आणि त्यांच्याकडे प्रत्युत्तरासाठी इतर अनेक पर्याय आहेत. त्यामुळे अधिक रक्तपात होऊ शकतो, म्हणून हे युद्ध कोणत्या उपाययोजनांद्वारे संपवता येईल हे पाहणे महत्त्वाचे आहे. इराण इस्रायलवर दहशतवादी हल्ले करत राहतो, क्षेपणास्त्र हल्ले करत राहतो किंवा युद्ध थांबवण्यासाठी आंतरराष्ट्रीय दबाव येईपर्यंत इतर मार्गांचा अवलंब करतो. इस्रायल त्याच्या शत्रूंवर हल्ला करतो, तेव्हा त्याला अनेकदा अमेरिका आणि प्रमुख युरोपीयन मित्रांकडून पाठिंबा मिळतो; परंतु हे देश त्वरित शत्रुत्व संपवण्याची मागणी करतात; मात्र इस्रायल हल्ला सुरू ठेवू इच्छितो. यापुढील काळात इस्रायलचे इराणवर हल्ले कायम राहतील आणि इराणही वेळोवेळी इस्रायलवर गोळीबार करेल, तसेच दहशतवाद आणि इतर प्रयत्न करेल. ट्रम्प यांनी अमेरिकेला या युध्दात उतरवल्यानंतर इराणनेही अमेरिकेला गंभीर परिणामांची धमकी दिली आहे. दोन्ही बाजुंकडून माघारीची शक्यता दिसत नाही. आखातातील युद्धामुळे कच्च्या तेलाच्या किमती वाढण्याची, पुरवठा साखळीवर परिणाम होण्याची आणि शेअर बाजारांमध्ये घसरण होण्याची शक्यता वाढली आहे. तेलाच्या किमतीत वाढ, महागाई आणि शेअर बाजारात अशांतता अशा समस्यांना तोंड द्यावे लागेल. इस्रायलने इराणच्या अणु आणि लष्करी प्रतिष्ठानांवर अलिकडेच केलेले हल्ले आणि इराणने केलेल्या प्रत्युत्तरामुळे मोठ्या युद्धाची भीती निर्माण झाली आहे. हा तणाव पूर्ण युद्धात बदलला, तर त्याचा परिणाम केवळ मध्य पूर्वेलाच नाही, तर संपूर्ण जगाच्या अर्थव्यवस्थेवर होऊ शकतो. मध्य पूर्व हा जगातील तेल उत्पादनाचा एक प्रमुख भाग आहे. जगातील सुमारे २५ टक्के तेल व्यापार इराण आणि होर्मुझच्या आखातासारख्या त्याच्या आसपासच्या भागातून होतो. इस्रायल आणि इराणमधील युद्ध आणखी वाढल्यास तेलाच्या पुरवठ्यात व्यत्यय येऊ शकतो. शिपिंग मार्ग बंद होऊ शकतात आणि तेल टँकरवर हल्ल्याचा धोका वाढू शकतो. यामुळे तेलाच्या किमती गगनाला भिडू शकतात. त्याचा परिणाम अलिकडेच दिसून येऊ लागला आहे. गेल्या काही दिवसांत तेलाच्या किमतीत ७-१३ टक्के वाढ झाली आहे. कच्च्या तेलाच्या किमती प्रतिपिंप ७४.६० डॉलर्सवर पोहोचल्या. युद्ध आणखी वाढले तर कच्च्या तेलाच्या किमती आणखी वेगाने वाढू शकतात. यामुळे भारतासारख्या देशांमध्ये पेट्रोल, डिझेल आणि स्वयंपाकाच्या गॅसच्या किमती वाढू शकतात. त्यामुळे सामान्य लोकांचा खर्च वाढेल. कच्च्या तेलाच्या वाढत्या किमतींमुळे महागाईदेखील वाढेल. तेलाचा वापर केवळ वाहनांसाठीच नाही, तर वस्तूंच्या उत्पादनासाठी आणि ते एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी नेण्यासाठीदेखील केला जातो. कच्चे तेल महाग झाले, तर वाहतुकीचा खर्च वाढेल. त्यामुळे अन्नपदार्थ आणि दैनंदिन वस्तूंच्या किमती वाढू शकतात. यामुळे भारतासारख्या देशांमध्ये मध्यमवर्गीय आणि गरीब कुटुंबांवर भार वाढेल.

दोन्ही देशांमधील युद्धाच्या बातमीने शेअर बाजारातही खळबळ उडून अलिकडेच भारतीय शेअर बाजारावरही मोठा परिणाम झाला. भीतीपोटी गुंतवणूकदार सोने किंवा अमेरिकन डॉलरसारख्या सुरक्षित ठिकाणी आपले पैसे गुंतवत आहेत. सोन्याची किंमत वाढली आहे. डॉलर मजबूत झाला आहे आणि त्यामुळे शेअर बाजारात घसरण दिसून येत आहे. तथापि, या तणावाचा काही बाजारपेठांवर अद्याप फारसा परिणाम झालेला नाही; परंतु जर युद्ध वाढले तर जागतिक शेअर बाजारांमध्ये मोठी घसरण होऊ शकते. भारतातील सेन्सेक्स आणि निफ्टी सारख्या बाजारपेठांवरही परिणाम होऊ शकतो. युद्धाचा जागतिक पुरवठा साखळीवरही परिणाम होऊ शकतो. जागतिक पुरवठा साखळी बंद पडल्याने इलेक्ट्रॉनिक्स, ऑटोमोबाईल्स आणि औषधे यासारख्या उद्योगांचे नुकसान होऊ शकते. यामुळे कारखाने बंद होऊ शकतात आणि बेरोजगारी वाढू शकते. अनेक विमान कंपन्यांनी मध्य पूर्वेतील उड्डाणे स्थगित किंवा रद्द केली आहेत आणि काही देशांनी त्यांचे हवाई क्षेत्र बंद केले आहे. मध्य पूर्वेतील सर्वात मोठी विमान कंपनी एमिरेट्सने सांगितले, की त्यांनी इराक, जॉर्डन, लेबनॉन आणि इराणला जाणारी आणि जाणारी उड्डाणे ३० जूनपर्यंत स्थगित केली आहेत. एतिहाद एअरवेजने अबू धाबी आणि तेल अवीव दरम्यानची उड्डाणे रद्द केली आहेत. कतार एअरवेजने इराण, इराक आणि सीरियाला जाणारी उड्डाणे तात्पुरती रद्द केली आहेत.

# अर्थनगरी चिंतेत, ॲपल चर्चेत



**अर्थनगरीतून**
**– महेश देशपांडे,**
आर्थिक घडामोडींचे जाणकार

इस्रायल आणि इराणमधील संघर्षाच्या निमित्ताने नवा आखाती संघर्ष पहायला मिळत आहे. हे युध्द जास्त काळ चालल्यास भारतावर परिणाम होण्याची शक्यता आहे. याच सुमारास भारताच्या बासमती तांदळाच्या निर्यातीला फटका बसला आहे. दरम्यान, ट्रम्प यांच्या शुल्कवाढीच्या धमकीनंतरही भारतात निर्मिलेल्या ९७ टक्के आयफोनची अमेरिकेत विक्री झाल्याचे दिसून आले आहे.

आणखी एका युध्दामुळे जगाच्या मानेवर महागाई वाढण्याची टांगती तलवार पहायला मिळत आहे. इस्रायल आणि इराणमधील संघर्षाच्या निमित्ताने नवा आखाती संघर्ष पहायला मिळत आअहे. हे युध्द जास्त काळ चालल्यास भारतावर परिणाम होण्याची शक्यता अर्थजगताने व्यक्त केली आहे. याच सुमारास भारताच्या बासमती तांदळाच्या निर्यातीला फटका बसला. दरम्यान, ट्रम्प यांच्या शुल्कवाढीच्या धमकीनंतरही भारतात निर्मिलेल्या ९७ टक्के आयफोनची अमेरिकेत विक्री झाल्याचे दिसून आले आहे. याखेरीज आठ महिन्यानंतर देशाने रोजगारवृद्धी अनुभवल्याची बातमी आहे.

इस्रायल आणि इराणमध्ये सुरू असलेल्या तणावाचा भारताच्या अर्थव्यवस्थेवर फारसा परिणाम झाला नसला, तरी हा संघर्ष आणखी वाढल्यास भारताला मोठे नुकसान सहन करावे लागू शकते, असे वरिष्ठ सरकारी अधिकाऱ्यांनी सांगितले. या लढाईमुळे कच्च्या तेलाच्या किमती वाढू शकतात. शेअर बाजारातही चढ-उतार होऊ शकते. या सगळ्या पार्श्वभूमीवर रुपयाचे मूल्यही घसरू शकते. जहाजांनी माल पाठवण्याचा खर्च वाढू शकतो. अर्थ मंत्रालय आणि इतर सरकारी संस्था बाजारपेठांवर लक्ष ठेवून आहेत. आंतरराष्ट्रीय बाजारात काय घडत आहे हे ते पाहतील. अर्थव्यवस्था मजबूत असल्यामुळे भारत अशा कोणत्याही समस्येला सहज तोंड देऊ शकतो. त्यातून भारताचे फार मोठे नुकसान होणार नाही. या युद्धाचा फटका इतर गोष्टींच्या किमतीवर फार काळ दिसणार नाही.

दरम्यान, इराण आणि इस्रायलच्या या तणावात भारतीय शेअर बाजार कोसळला. इस्रायल आणि इराणमधील तणावामुळे जगभरातील शेअर बाजार कोसळत असल्याने गुंतवणूकदार घाबरले होते. त्यामुळे अनेकांनी बाजारातून पैसे काढून घेतले. सेन्सेक्स आणि निफ्टी ०.७ टक्क्यांनी घसरले होते. डॉलरच्या तुलनेत रुपया कमकुवत झाला. रुपयाचे मूल्य ०.६ टक्क्यांनी घसरून ८६.०९ टक्क्यांवर पोहोचले. डॉलरची किंमत अधिक होत असल्याने असे घडल्याचे सांगण्यात आले. इस्त्रायलच्या हल्ल्यानंतर कच्च्या तेलाच्या किमती १२ टक्क्यांनी वाढून प्रति पिंप ७८.५ डॉलर्स एवढा झाल्या; पण नंतर खाली आल्या. इस्त्रायल आणि इराणच्या तेल प्रतिष्ठानांवर हल्ला केला नसल्याने हे घडल्याचे सांगण्यात येते. इस्त्रायल आणि इराणच्या या हल्ल्यानंतर होर्मुझची सामुद्रधुनी बंद होऊ शकते, अशी भीती आहे. हा जगातला अतिशय महत्त्वाचा मार्ग आहे. त्यावरून जगातील सुमारे २० टक्के तेलव्यापार होतो. इराणने जागतिक कोंडी करण्यासाठी हा मार्ग अडवल्यास जहाजांनी वस्तू पाठवण्याचा आणि विमा मिळवण्याचा खर्च प्रचंड प्रमाणात वाढू शकतो. याचा परिणाम भारतावरही होऊ शकतो. त्यामुळे भारतात पेट्रोल आणि डिझेलच्या किमती वाढू शकतात. इतर देशांमधून भारतात येणाऱ्या वस्तूंच्या किमतीवरही याचा परिणाम होण्याची शक्यता आहे.

इस्रायल आणि इराणमधील वाढत्या तणावामुळे मध्य पूर्वेत अशांतता निर्माण झाल्यामुळे पंजाबमधील बासमती तांदळाच्या निर्यातदारांची झोप उडली आहे. मध्य पूर्वेत असे अनेक देश आहेत, जे भारतातून मोठ्या प्रमाणात बासमती तांदूळ आयात करतात. सध्या बासमती तांदूळ वाहून नेणारी अनेक जहाजे प्रवासात मध्येच आहेत. दोन्ही देशांमधील युद्ध सुरू राहिल्यास जहाजांना मधूनच परतावे लागू शकते. यामुळे कोट्यवधी रुपयांचे नुकसान होईल. ‘पंजाब बासमती एक्सपोर्टर्स असोसिएशन’चे अशोक सेठी यांनी सांगितले की या युद्धाला तोंड देणे आपल्या क्षमतेबाहेर आहे. बासमती तांदळाच्या अनेक खेपांसह आमची अनेक जहाजे आधीच मध्यभागी आहेत. तणाव वाढल्यास ते त्यांच्या गंतव्यस्थानी पोहोचू शकणार नाहीत. त्यामुळे आमचे लाखोंचे नुकसान होईल. मध्य पूर्व हा भारताकडून बासमती तांदळाचा मोठा खरेदीदार आहे आणि पंजाब देशाच्या एकूण बासमती उत्पादनापैकी ४० टक्के उत्पादन करतो. इस्रायलने इराणच्या अनेक अणु आणि लष्करी केंद्रांवर क्षेपणास्त्र हल्ले केल्यानंतर इराणनेही इस्रायलवर हल्ला करून प्रत्युत्तर दिले. इराणचे सर्वोच्च नेते अयातुल्ला अली खोमेनी यांनीही इस्रायलला देशावर हल्ला केल्याबद्दल ‘कठोर शिक्षा’ देण्याचा इशारा दिला. या पार्श्वभूमीवर सेठी म्हणाले की, निर्यात करायच्या वस्तूंचा विमा मिळवण्यातही अडचणी येत आहेत. कारण, तणावाचे वातावरण असल्यामुळे विमा कंपन्यादेखील कव्हर देण्यास नकार देत आहेत. हा विषय बासमती तांदळापुरता मर्यादित नाही. युद्ध वाढल्यास तेल आयातीतही समस्या येतील. त्यामुळे भारताचे मोठे नुकसान होईल.

कृषी आणि प्रक्रियाकृत अन्न उत्पादने निर्यात विकास प्राधिकरण (अपेडा) नुसार, २०२२ मध्ये बासमती तांदळाच्या निर्यातीतून भारताने ४८ हजार कोटी रुपयांचे परकीय चलन कमावले. त्यात पंजाबचा वाटा किमान ४० टक्के होता. दुसरीकडे, इराणवरील अमेरिकेच्या निर्बंधांमुळे भारतातून इराणला बासमती तांदळाच्या निर्यातीवर आधीच परिणाम झाला आहे. अमेरिकेच्या निर्बंधांमुळे भारताने इराणकडून तेल आयात करणे बंद केले आहे. यामुळे इराणकडे भारताला रुपयांमध्ये पैसे देण्यासाठी साठा नाही. दुसरीकडे इराणी चलनामध्ये घसरण झाल्यामुळे आयातदेखील महाग झाली आहे. वाणिज्य मंत्रालयाच्या आकडेवारीनुसार भारताच्या एकूण बासमती तांदळाच्या निर्यातीमध्ये (३.५४ अब्ज) इराणचा वाटा सुमारे २३ टक्के (०.८१ अब्ज डॉलर) होता. २०२२ ते २०२५ दरम्यान हा वाटा बारा टक्क्यां (०.७५ अब्ज डॉलर) पर्यंत घसरला आहे.

दरम्यान, अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या धमकीनंतरही अमेरिकेत विकल्या जाणाऱ्या ॲपलचे ९७ टक्के आयफोन भारतात बनवले जात आहेत. या वर्षी मार्च ते मे दरम्यान भारतातून ॲपलने निर्यात केलेल्या सर्व आयफोनपैकी ९७ टक्के आयफोन अमेरिकेत पाठवले गेले. त्यांची एकूण किंमत २७ हजार सातशे कोटी रुपये आहे. अहवालानुसार, केवळ मे महिन्यामध्ये भारतातून सुमारे ८,६०० कोटी रुपयांचे आयफोन अमेरिकेमध्ये निर्यात करण्यात आले. मार्चमध्ये सुमारे ११,१९५ कोटी रुपयांच्या आयफोन निर्यातीचा उच्चांक आहे. या वर्षी जानेवारी ते मे दरम्यान भारतातून अमेरिकेत ३७ हजार कोटी रुपयांचे आयफोन पाठवण्यात आले आहेत. २०२४ मध्ये सुमारे ३२ हजार कोटी रुपयांचे आयफोन निर्यात करण्यात आले होते. याचा अर्थ निर्यात पाच हजार कोटी रुपयांनी वाढली आहे. २०२४ पर्यंत अमेरिकेत विकल्या जाणाऱ्या आयफोनपैकी केवळ पन्नास टक्के आयफोन भारतात बनवले जात होते. ट्रम्प यांनी ॲपलला २५ टक्के टॅरिफ लावण्याची धमकी दिली. त्यानंतर हा आकडा ९७ टक्क्यांवर पोहोचला आहे.

‘ॲपल’ने भारतातून आपल्या निर्यातीची पुनर्रचना अशा प्रकारे केली आहे की, ते आता फक्त अमेरिकन बाजारपेठेतच आपली उत्पादने निर्यात करेल. यापूर्वी नेदरलँड्स, चेक रिपब्लिक आणि ब्रिटनसारख्या देशांमध्ये जास्त निर्यात केली जात होती. फॉक्सकॉन, पेगाट्रॉन आणि विस्ट्रॉन हे भारतातील प्रमुख आयफोन उत्पादक आहेत. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या धमकीनंतर आयफोनच्या किंमतीत वाढ होऊ शकते असा अंदाज आहे. यामुळे ॲपलच्या विक्री आणि नफ्यावर परिणाम होऊ शकतो. इतकेच नाही तर, ॲपल आता ॲमेझॉन, वॉलमार्ट आणि इतर प्रमुख कंपन्यांसह व्हाईट हाऊसच्या नजरेमध्ये आले आहे. प्रत्यक्षात या कंपन्या ट्रम्प यांनी लादलेल्या टॅरिफमुळे निर्माण झालेल्या अनिश्चितता आणि महागाईच्या दबावाला प्रतिसाद देण्याचा प्रयत्न करत आहेत. ट्रम्प ‘ॲपल’ला सतत धमकी देत आहेत की अमेरिकेत विकले जाणारे आयफोन फक्त अमेरिकेत बनवले पाहिजेत. त्यांनी हे भारतात किंवा अमेरिकेबाहेरील इतर कोणत्याही देशात उत्पादित केले, तर ते ‘ॲपल’साठी खूप महागडे ठरेल. ट्रम्प यांनी समाजमाध्यमांवर म्हटले आहे की तंत्रज्ञान कंपनीने असे न केल्यास ‘ॲपल’च्या उत्पादनांवर २५ टक्के शुल्क लावले जाईल. ट्रम्प यांच्या या धमक्यांनंतर, अमेरिकेच्या फ्युचर्स आणि जागतिक बाजारपेठेत घसरण झाली.

आता एक लक्षवेधी बातमी. भारतात रोजगारनिर्मितीमध्ये सलग आठ महिने घट झाल्यानंतर, मे महिन्यात ८.९ टक्क्यांची वाढ नोंदवण्यात आली. तथापि, वार्षिक आधारावर त्यात १.८ टक्क्यांची किंचित घट नोंदवण्यात आली. नोकऱ्यांशी संबंधित ‘इंडिड’ या जागतिक वेबसाइटच्या अहवालानुसार घट असूनही भारतात रोजगारनिर्मिती कोविडच्या आधीच्या काळाच्या तुलनेत सुमारे ८० टक्के जास्त राहिली. इतर प्रमुख बाजारपेठांच्या तुलनेत हे प्रमाण जास्त आहे. आशिया पॅसिफिक प्रदेशातील वरिष्ठ अर्थशास्त्रज्ञ कॅलम पिकरिंग म्हणाले की भारतात रोजगारनिर्मिती इतर देशांच्या तुलनेत वेगाने वाढत आहे, कारण देश अधिक औपचारिक धाटणीची आर्थिक व्यवस्था बनण्याकडे वाटचाल करत आहे. देश बदलत असताना औपचारिक क्षेत्रात होणारी रोजगारनिर्मिती देशभरातील एकूण रोजगारवाढीच्या तुलनेत खूपच मजबूत होईल. अलिकडच्या वर्षांमध्ये आपण हे सातत्याने पाहिले आहे. इतर अर्थव्यवस्था अशा बदलातून जात नाहीत. ‘इंडीड’चा हा अहवाल जागतिक नोकरी वेबसाइटच्या प्लॅटफॉर्मवर मे २०२० (जागतिक महामारीचा काळ), मे २०२४ आणि मे २०२५ च्या डेटाच्या विश्लेषणावर आधारित आहे. त्यात म्हटले आहे की प्रामुख्याने बालसंगोपन (२७ टक्के), वैयक्तिक काळजी आणि गृह आरोग्य (२५ टक्के), शिक्षण (२४ टक्के) आणि उत्पादन आणि उत्पादन (२२ टक्के) मध्ये रोजगारनिर्मिती झाली. ‘जनरेटिव्ह एआय’ क्षेत्रात मे २०२५ पर्यंत रोजगारनिर्मिती १.५ टक्के होती. ती गेल्या वर्षीच्या तुलनेत दुप्पट आहे.

# ‘शासन आपल्या दारी’चा ग्रामस्थांनी घेतला लाभ

### नेप्ती येथे छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद



**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : नेप्ती येथील स्वस्तिक मंगल कार्यालयात छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. उपविभागीय अधिकारी सुधीर पाटील आणि तहसीलदार संजय शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली महसूल विभागाच्या वतीने हे शिबिर पार पडले. या शिबिराला नेप्ती मंडळातील सर्व गावांमधून नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून सकारात्मक प्रतिसाद दिला.

या शिबिरात नागरिकांना त्यांच्या आवश्यकतेनुसार जात प्रमाणपत्र, उत्पन्न प्रमाणपत्र, रहिवासी दाखला, नॉन क्रिमिलिअर दाखला अशा महत्त्वपूर्ण कागदपत्रांचे वाटप करण्यात आले. त्यामुळे अनेकांना शिक्षण, नोकरी व शासकीय योजनांचा लाभ घेण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.


महसूल विभागासह कृषी विभाग, समाजकल्याण विभाग, आणि संजय गांधी निराधार योजना विभागाने देखील या शिबिरात सहभाग नोंदवला. नागरिकांना संजय गांधी निराधार योजना, इंदिरा गांधी वृद्धापकाळ योजना, श्रावणबाळ योजना, प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजना, महाडीबीटीवरील योजनांद्वारे फळबाग लागवड आणि शेतीसाठी अनुदान मिळवून देण्यात आला.

या शिबिराप्रसंगी माजी जि. प. सदस्य अरुण होळकर, बी. आर. कर्डिले, सामाजिक कार्यकर्ते रामदास फुले, रामराव कांडेकर, अनिल पवार, पांडुरंग कळमकर, अमोल चौगुले, अमोल औटी, सूरज पवार, सुभाष नेमाने ,बाळासाहेब काळे, मंगल कांडेकर, शिवांजली कांडेकर, प्रकाश कांडेकर, लक्ष्मण कांडेकर, हौशीराम जपकर, गणेश वाळके, अभिजित शेटे, शिवाजी होळकर, परिसरातील गावचे सर्व सरपंच, नायब तहसीलदार गणेश भानवसे, नेप्ती मंडळअधिकारी प्रताप कळसे आदी उपस्थित होते.

**सेवा मिळाल्याने ग्रामस्थ समाधानी**

एकाच छताखाली अनेक सेवा ही संकल्पना या शिबिराच्या माध्यमातून प्रत्यक्षात उतरवली गेली. नागरिकांना विविध खात्यांची कार्यालये न फिरता, एकाच ठिकाणी सेवा मिळाल्याने ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले.

# ‘पवार’च्या विद्यार्थ्यांचे उन्हाळी २०२५ परीक्षेत सुयश



**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीरामपूर** : नुकत्याच पार पडलेल्या महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण महामंडळ बोर्डाच्या उन्हाळी २०२५ परीक्षेमध्ये अजितदादा पवार कॉलेज ऑफ पॉलिटेक्निक वडाळा महादेवच्या विद्यार्थ्यांनी दरवर्षी प्रमाणे यावर्षीही उज्वल यश संपादन केले.

मेकॅनिकल इंजिनियरिंग मध्ये प्रथम वर्षात प्रथम क्रमांक आदित्य राजदेवे ६९.४४ गुण, द्वितीय क्रमांक बत्तासे साहिल ६७.४३, तृतीय क्रमांक बागवान अरमान ६७.२२ गुण. द्वितीय वर्षामध्ये प्रथम क्रमांक अप्पासाहेब कातोरे ७२.४४ गुण, द्वितीय क्रमांक सागर हिवराळे ७१ गुण व तृतीय क्रमांक अभिषेक येवले ६८.५६ गुण. तृतीय वर्षातील सचिन जगदाळे याने ७६.४४ गुणांसह प्रथम क्रमांक मिळवला.

इलेक्ट्रिकल इंजिनियरिंग मध्ये प्रथम वर्षात प्रथम क्रमांक अनिशा खान हिने ७५.२९ गुण, द्वितीय क्रमांक यश अरगडे ६१.१७ गुण व तृतीय क्रमांक मोरे ओंकार ६१.०६ गुण. द्वितीय वर्षामध्ये प्रथम क्रमांक आढाव विश्वास ७२.१२ गुण, द्वितीय क्रमांक बांद्रे महेश ७०.७१ गुण व तृतीय क्रमांक आदित्य परदेशी ६८.४४ गुण. तृतीय वर्षामध्ये वैष्णवी कर्जुले ७६.६३ गुणांसह प्रथम, मगर भक्ती ७५.६३ व शेख साहिल ७१.५० यांनी अनुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक मिळवला. यासह आदी विभागातही विद्यार्थ्यांनी मोठे यश प्राप्त केले आहे.

**मान्यवरांसह शिक्षकांनी केले विद्यार्थ्यांचे कौतुक**

विद्यार्थ्यांचे शिवा ट्रस्ट संस्थेचे संस्थापक व अध्यक्ष डॉ. बाळासाहेब पवार, संस्थेचे संचालक दिलीप पवार, श्रीकांत पवार, जनसंपर्क अधिकारी सुशील लांडे, प्राचार्या पूनम बोधक, अनिल गीते, सुनील खिलारी, प्रकाश जाधव, युवराज गायकवाड, मुस्कान खान, गणेश जोरे आदी कर्मचाऱ्यांनी कौतुक केले.

पान १ वरून पान १ वरून पान १ वरून

## मंत्री विखेंच्या निर्णयाने बळीराजा सुखावला

परिणाम मुळा, भंडारदरा व गोदावरी धरण समूहाच्या लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांना भोगावे लागले. यावर्षी उन्हाची तिव्रता भीषण होती, धरणातील उपलब्ध पाणी साठ्यावर आवर्तनाचे नियोजन करण्याचे मोठे आव्हान जलसंपदा विभागा समोर होते. मात्र जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी जिल्ह्यातील मुळा, भंडारदरा आणि गोदावरी लाभक्षेत्रातील सर्व लोकप्रतिनिधी, लाभधारक आणि विभागाच्या अधिकाऱ्यांमध्ये योग्य समन्वय साधत आवर्तनाचे नियोजन केले. गोदावरी कालव्यांना रब्बी हंगामात एक आणि उन्हाळी हंगामात तीन आवर्तने देण्यात आली. दोन्ही हंगामातील आवर्तनात एकूण साडेपाच हजार दलघफु पाण्याचा वापर झाला. भंडारदरा प्रकल्पातून प्रवरा कालव्यांना खरीप हंगामात एक, रब्बी हंगामात सिंचनाकरीता दोन व बिगर सिंचनाकरीता एक तसेच उन्हाळी हंगामात सिंचनाकरीता एक व बिगर सिंचनासाठी एक अशा सहा आवर्तनाचे यशस्वी नियोजन झाल्याने दोन्ही हंगामात ८६, ३२५ हेक्टर क्षेत्र सिंचित झाले. मुळा प्रकल्पांतर्गत सिंचनासाठी रब्बीमध्ये दोन आणि उन्हाळ्यात एक आवर्तन देण्यात आले. रब्बी आणि उन्हाळ्यात दोन्ही आवर्तनातील सिंचनाकरीता १२,७९३ दलघफु पाणी वापर झाला. जिरायत भागाला वरदान ठरलेल्या निळवंडे प्रकल्पाच्या माध्यमातून रब्बी आणि उन्हाळी हंगामात एकुण तीन आवर्तन दिली गेली.

डाव्या आणि उजव्या कालव्यांना पाणी दिल्याने लाभक्षेत्रातील जवळपास आठशेपेक्षा जास्त बंधारे, पाझर तलाव भरले गेले. लाभक्षेत्रात गावोगावी असलेले ओढे, नाले प्रवाहित केले. यामुळे पाणी टंचाईची समस्या असलेल्या गावांनी पाणी मिळाल्याचे समाधान व्यक्त केले आहे. परंतू यापेक्षाही महत्वाचे म्हणजे जमीनीतील आणि विहीरीच्या पाणी पातळीत झालेली वाढ झाल्याने पिकांना याचा चांगला फायदा होईल असे सांगितले जाते. निळवंडे लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांना पाणी देणार हा शब्द मंत्री विखे पाटील यांनी कृतीत उतरवून दाखवला.

यापुर्वी मुळा धरणातून जायकवाडीसाठी सन २०१४ मध्ये ३ हजार ८०७ दलघफु, २०१५ मध्ये १ हजार ६०८ दलघफु, २०१८ मध्ये १ हजार ९०८ दलघफु आणि २०२३ मध्ये १ हजार ९०६ दलघफु, पाणी सोडावे लागले होते. मात्र सन २०२४ मध्ये जायकवाडीला पाणी सोडले नाही. मुळा धरणात सध्या १० हजार ३८८ म्हणजे ३९.९५ टक्के पाणीसाठा शिल्लक असून, जिवंत साठा ५ हजार ८८८ म्हणजे २७.३८ टक्के इतका आहे.

हीच परिस्थिती भंडारदरा धरण समूहाची राहिली. यंदा उन्हाळी हंगामात सर्व आवर्तनांचे योग्य नियोजन विभागाने यशस्वी केले. सध्या भंडारदरा धरणात ३.९० टिएमसी आणि निळवंडे धरणात २ हजार ७०१ टिएमसी पाणीसाठा उपलब्ध आहे. यापुर्वी जायकवाडीला भंडारदरा धरण समुहातून २०१४-१५ साली ४.३ टिएमसी, २०१५-१६ वर्षात ६.५० टिएमसी, २०१८-१९ मध्ये ३८५ टिएमसी २०२३-२४ मध्ये ३.७५६ टिएमसी पाणी सोडण्यात आल्याने लाभक्षेत्राला मोठा फटका बसला होता. यावर्षी जून महीन्यातच झालेल्या पावसाने जायकवाडीमध्येही चांगला पाणी साठा झाल्याचा दिलासा अहिल्यानगरला सुध्दा मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त होवू लागली आहे.

## शहरात ५०० सदनिकांची घरकूल योजना राबविणार

टप्प्यातील अनुदान लाभार्थ्याला मिळणार आहे. घरकुल योजनेबाबत व्यापक जनजागृती करण्यासाठी महानगरपालिकेकडून विविध कंपन्या, शाळा, मोठ्या व्यावसायिक आस्थापना अशा विविध ठिकाणी माहिती देण्यासाठी कार्यशाळा घेतल्या जात आहेत. अधिकाधिक नागरिकांपर्यंत या योजनेची माहिती पोहचवण्याचे प्रयत्न आहेत. इच्छुकांनी अर्ज करण्यासाठी महानगरपालिकेच्या प्रकल्प विभागात संपर्क साधावा, असे आवाहन आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांनी केले आहे.

## एमआयडीसी विकास होणार : स्नेहलता कोल्हे

करणार असल्याचे कोल्हे यांनी सांगितले. शेतकऱ्यांची कुठलीच आडवणुक होणार नाही यासाठी प्रशासनाने तातडीने लक्ष घालून शेतकऱ्यांचे प्रश्न सोडावे अशी सूचना कोल्हे यांनी केली होती. सूत्रसंचालन निरंजन गुडघे यांनी केले. तर आभार आप्पासाहेब जावळे यांनी मानले. युवानेते विवेक कोल्हे यांनी संजीवनी युवा प्रतिष्ठानच्या माध्यांतून एमआयडीसी होण्यासाठी हजारो स्वाक्षरी मोहीम राबवत मा. आ. कोल्हे यांच्या समवेत सरकारकडे केलेल्या प्रयत्नांचा लढा हा महत्वाचा ठरला असून प्रगतीच्या वाटा खुल्या होण्यासाठी कोल्हे यांचे प्रयत्नांना यावेळी उजाळा मिळाला.

## अरुण तनपुरेंसह कार्यकर्त्यांचा अजित पवार गटात प्रवेश

कारखान्याच्या निवडणुकीत तनपुरेंनी एकतर्फी विजय मिळवत कारखाना ताब्यात घेतला. कारखान्याला नवसंजीवनीची आशा असल्याने सत्तेपासून दूर राहून चालणार नाही, असा समज असल्याने गेल्या काही दिवसांपासून अरुण तनपुरे हे अजित पवार यांच्या गटात सामील होणार असल्याची चर्चा होती, त्याला आता अधिकृत स्वरूप प्राप्त झाले. या प्रवेशासाठी राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष अशोक सावंत आणि राहुरी शहराध्यक्ष सुनील भट्टड यांनी महत्त्वपूर्ण शिष्टाई केली.

प्रवेशावेळी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे, आमदार शिवाजीराव गर्जे, आमदार काशिनाथ दाते, जिल्हाध्यक्ष अशोक सावंत आदी मान्यवर उपस्थित होते.पुढील आठवड्यात अरुण तनपुरे यांचे समर्थक व स्थानिक कार्यकर्त्यांचा मोठा संच अजित पवार गटात प्रवेश करणार असल्याने प्रवेश सोहळा आयोजित केला जाणार आहे. विशेष म्हणजे, माजी मंत्री प्राजक्त तनपुरे यांचे चुलते असलेले अरुण तनपुरे यांनी अजित पवार गटात प्रवेश केल्याने प्राजक्त तनपुरे यांची भूमिका काय असेल याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

# वृक्षारोपण हा वारकऱ्यांचा संकल्प समाजाला दिशादर्शक

## आ. संग्राम जगताप; संत निवृत्तीनाथ महाराज समाधी पायी दिंडी सोहळ्याचे गणेश भोसलेंकडून उत्साहात स्वागत

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : नाशिक जिल्ह्यातील त्र्यंबकेश्वर येथून प्रस्थान केलेल्या संत निवृत्तीनाथ महाराज समाधी पायी दिंडीचे मा. उपमहापौर गणेश भोसले यांच्या कडून उत्साहात स्वागत करण्यात आले. विठ्ठल नामाच्या गजरात बुरुडगाव रोड परिसरातील वातावरण भक्तिरसात न्हालं. या पवित्र दिंडीच्या निमित्ताने वारकऱ्यांच्या हस्ते वृक्षारोपणाचा विशेष कार्यक्रम संपन्न झाला. 'वृक्षवल्ली आम्हा सोयरे' या संत तुकाराम महाराजांच्या अभंगाची आठवण करून देत पर्यावरण संवर्धनाचा

> गणेश भोसले यांनी विकास कामांबरोबर सामाजिक प्रश्न सोडविण्याचे काम केले आहे. त्यांनी समाजामध्ये वृक्ष संदर्भात जनजागृती केली, त्यांचा वारसा संपत बारस्कर हे पुढे घेऊन जात आहे. पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी नवनवीन भागामध्ये नागरिकांनी वृक्षरोपण करून संवर्धनाची काळजी घेतली पाहिजे. वारकरी संप्रदायाच्या भक्तिभाव, शिस्त, आणि सेवाभावाने साकारलेला हा सोहळा नक्कीच अनेकांच्या मनात अध्यात्म आणि पर्यावरण संवर्धनाचा दीप उजळवणारा ठरेल.
>
> **– संग्राम जगताप, आमदार**

अनोखा संदेश या दिंडीद्वारे देण्यात आला.

यावेळी आ. संग्राम जगताप, मा. उपमहापौर गणेश भोसले, मा. नगरसेवक संजय चोपडा, प्रकाश भागानगरे, प्रा. माणिकराव विधाते, संतोष भोसले, नामदेव भोसले, संतोष ढाकणे, राहुल बोरुडे व वारकरी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आ. संग्राम जगताप म्हणाले की, वृक्षारोपण हे केवळ औपचारिकता न राहता, त्यांचे संवर्धन करण्याचा वारकऱ्यांचा संकल्प समाजाला दिशादर्शक राहील. हजारो वर्षांपूर्वी साधु-संतांनी वृक्षाचे महत्व सांगितले असून, मानवी जीवनामध्ये त्याचे महत्त्व खूप आहे. दिल्ली सारख्या शहराची परिस्थिती प्रदूषणामुळे भयानक झाली आहे. तरी आपण पुढचे पाऊल उचलून आत्ताच पर्यावरण सम



> मा. उपमहापौर गणेश भोसले यांनी गेल्या १० वर्षांपूर्वी आमच्या हस्ते वृक्षारोपण केले होते. ते झाडे आज पाहून मनाला समाधान मिळाले, वृक्षाचे महत्व विज्ञानामध्ये देखील असून संतांनी देखील हजारो वर्षांपूर्वी सांगितले होते.
>
> **– हभप गोळे महाराज गुरुजी**

तोलनाची काळजी घेण्यासाठी वृक्षारोपण व संवर्धनाची लोक चळवळ उभी केली पाहिजे.

माजी उपमहापौर गणेश भोसले म्हणाले की, आपल्या महाराष्ट्राला संतांची महान परंपरा लाभली आहे. संतांनी केवळ अध्यात्मिकतेचा नव्हे तर सामाजिक जागृतीचाही संदेश दिला. वारकरी पंथ ही आपल्या संस्कृतीची जिवंत ओळख आहे. इथे जाती-धर्म, वर्ग-भेद नाही, इथे केवळ 'विठ्ठल नाम ाचा गजर' आहे. वारकऱ्यांची सेवा म्हणजेच विठ्ठलाची खरी भक्ती होय. वृक्षारोपणासारख्या उपक्रमातून आपण संतांच्या विचारांना आधुनिक संदर्भात पुढे नेतो आहोत, ही अतिशय अभिमानाची बाब आहे.

# प्रशासनाकडून कामगारांची कागदोपत्री दिशाभूल

## डॉ. करणसिंह घुले यांनी कामगारांच्या मांडल्या व्यथा; बेमुदत चक्री उपोषण स्थगित

**जनता आवाज वृत्तसेवा**

**नेवासा** : नेवासा नगरपंचायतींच्या कामगारांच्या विविध प्रश्नांबाबत जिल्हा काम गार विभागातील अधिकारी व नेवासा नगरपंचायतींचे अधिकारी यांची लवकरच बैठक घेऊन प्रश्न मार्गी लावण्याचे आश्वासन वरिष्ठांनी कामगारांना दिल्याने सकाळी सुरू करण्यात आलेले धरणे आंदोलन सायंकाळी स्थगित करण्यात आले.

नेवासा नगरपंचायत येथील कार्यरत कर्मचारी, निवृत्त कर्मचारी व मयत कर्मचाऱ्यांच्या वारसांच्या विविध प्रश्नांसाठी भारतीय मजदूर संघाच्या पुढाकाराने मंगळवारी बेमुदत चक्री उपोषण व धरणे आंदोलन करण्यात आले.

यावेळी डॉ. करणसिंह घुले यांनी कामगारांच्या विविध अडचणी प्रास्ताविकात मांडल्या. तसेच नगरपंचायत प्रशासनाकडून कामगारांच्या अज्ञानाचा गैरफायदा घेऊन कशी कागदोपत्री दिशाभूल केले जाते सोदाहरण स्पष्ट केले. तसेच आंदोलनाची दिशाही स्पष्ट करण्यात आली.

दुपारी उशिरापर्यंत नगरपंचायत प्रशासनाकडून आंदोलनाची कुठलीही अधिकृत दखल घेण्यात आली नव्हती. तीव्र आंदोलन करण्याचा इशारा दिल्यानंतर हालचाली गतीमान झाल्या.

जिल्हा कामगार कार्यालयाचे प्रतिनिधी आप्पा चाटे यांच्याशी चर्चा करून आयुक्त कार्यालयात कामगारांच्या प्रश्नाविषयी बैठक लावण्या कामी पुढाकार घेतला. ही बैठक लवकरच घेऊन कामगारांचे विविध प्रश्न मार्गी लावण्याचे आश्वासन कामगार विभागातील आप्पा चाटे यांनी दिल्यानंतर हे आंदोलन सायंकाळी स्थगित करण्यात आले. यावेळी नंदकुमार पाटील,भाऊसाहेब वाघ, मनोज पारखे, कृष्णा डहाळे, सुनील वाघ, दिगंबर पवार, गणपत मोरे, स्वप्निल मापारी यांनी म नोगत व्यक्त करून आंदोलनाला पाठिंबा दर्शविला.

यावेळी विकास चव्हाण, राजेंद्र मापारी, राजू मुथा, सतीश मुळे, दौलत चक्रनारायण, अस्लम शेख, डेव्हिड साळवे, मंगल चव्हाण, शोभा चव्हाण, उलिसा चक्रनारायण, शांताबाई चक्रनारायण, अशोक आल्हाट, भोसले, सरोदे, अजय चक्रनारायण सह कामगार मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.




### आ. लंघेंनी कामगारांच्या अडचणी घेतल्या जाणून

आ. विठ्ठलराव लंघे यांनी दूरध्वनीवरून आंदोलन कार्यकर्त्यांशी संपर्क साधला. अडचणी जाणून घेतल्या. नगरपंचायत व जिल्हा कामगार कार्यालयातील अधिकाऱ्यांना आवश्यक त्या सुचना दिल्या. त्यानुसार आमदारांचे प्रतिनिधी गणेश लंघे व भाऊसाहेब वाघ यांनी कामगारांच्या अडचणी जाणून घेतल्या.

# प्रशासनाच्या लेखी आश्वासनानंतर आंदोलन स्थगित

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पाथर्डी** : तालुक्यातील सोनोंशी ग्रामपंचायत हद्दीतील सार्वजनिक रस्त्यावर काही नागरिकांनी केलेल्या अतिक्रमणामुळे घरात ये-जा करण्याचा मार्ग बंद झाल्याने ग्रामस्थ अंकुश आव्हाड यांनी काल पंचायत समिती पाथर्डीच्या प्रवेशद्वारावर ठिय्या आंदोलन केले. त्यांच्या आंदोलनाला विविध सामाजिक व राजकीय पदाधिकाऱ्यांचा पाठिंबा लाभला. अखेर पंचायत समिती प्रशासनाने लेखी आश्वासन दिल्यानंतर आंदोलन मागे घेण्यात आले.

आव्हाड म्हणाले की, त्यांच्या घराकडे जाणाऱ्या रस्त्यावर तीन कुटुंबांनी अतिक्रमण करून शौचालय, बोअर, विटांचे घर, ओटे आदी बांधून रस्ता अडवला आहे. त्यामुळे त्यांना घरात ये-जा करणे कठीण झाले आहे. या अतिक्रमणाबाबत त्यांनी आधीच जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे लेखी तक्रार दाखल केली होती, मात्र अद्याप कोणतीही ठोस कारवाई झाली नव्हती. त्यामुळे त्यांनी आज आंदोलनाचा मार्ग अवलंबला.

या आंदोलनात शिवसेना ठाकरे गट तालुकाप्रमुख भगवान दराडे, नवनाथ चव्हाण, सुनील पाखरे, सचिन नागपुरे, युसुफ शेख, विजय चांगुने, नागनाथ गर्जे, केशव खेडकर, मंगेश राठोड, आदर्श काकडे आदींनी सहभाग घेतला.



### .... अन्यथा पुन्हा आंदोलन करणार : आव्हाड

आंदोलनकर्त्यांशी संवाद साधताना पंचायत समिती प्रशासनाने पुढील दहा दिवसांत चौकशी करून योग्य ती कारवाई केली जाईल, असे लेखी आश्वासन दिले. त्यामुळे आंदोलन शांततेत मागे घेण्यात आले. मात्र प्रशासनाने कारवाई न केल्यास आणखी तीव्र आंदोलन छेडले जाईल, असा इशारा आव्हाड यांनी दिला आहे.

# मन सदृढ राहण्यासाठी योगसाधना काळाची गरज

## डॉ. महादेव जरे; श्रीगोंदा महाराजा जिवाजीराव शिंदे महाविद्यालय योग दिन साजरा

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीगोंदा** : योग साधना भारतात फार प्राचीन काळापासून प्रचलित आहे. योग म्हणजे शरीर, मन, भावना आणि संकल्पना यांचे नियमन होय शरीर व मन सदृढ राहण्यासाठी योगसाधना ही आधुनिक काळाची गरज आहे, असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. महादेव जरे यांनी केले.

### विविध योगासनाची केली प्रात्यक्षिके

प्राथमिक हालचाली करून ताडासन, वृक्षासन, पादहस्तासान, अर्धचक्रासन, त्रिकोणासन, भद्रासन, भुजंगासन व कपालभाती आदी योगासनाची प्रात्यक्षिक करून घेतली.



श्रीगोंदा येथे महाराजा जिवाजीराव शिंदे महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय योग दिन कार्यक्रमाच्या निमित्ताने बोलत होते. योग गुरु प्राध्यापक सुनील टकले यांनी विद्यार्थ्यांना व शिक्षकांना योग साधनेचे महत्त्व समजावून सांगितले.

या कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. प्रकाश साळवे, डॉ. सुदाम भुजबळ, डॉ. नितीन थोरात व पर्यवेक्षक रत्नाकर झिटे शारीरिक शिक्षण संचालिका प्रा. कल्पना बागुल, क्रीडा शिक्षक संजय डफळ, एन. सी. सी ऑफिसर डॉ. किरण ढवळे, एन. एस. एस प्रमुख डॉ. भाऊ बुलाखे सर्व विभाग प्रमुख इत्यादी स्टाफ उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. कल्पना बागुल यांनी केले क्रीडा विभाग, राष्ट्रीय सेवा योजना विभाग, विद्यार्थी कल्याण मंडळ एन. सी. सी विभाग, एन. एस. एस विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयात जागतिक योग दिन साजरा करण्यात आला. उपप्राचार्य डॉ. प्रकाश साळवे यांनी आभार मानले.

# कोल्हारच्या दिंडीतून पर्यावरण पूरक संदेश

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोल्हार** : येथील सद्गुरु श्री ज्ञानेश्वर सेवा मंडळाच्या दिंडीने झाडे लावा झाडे जगवा हा पर्यावरण पूरक संदेश देत मोठ्या भक्ती भावाने पंढरपूरकडे प्रस्थान केले.

मागील वर्षी दिंडीच्या मार्गात चिंचुक्यांच्या बियांचे यशस्वीरित्या रोपण करण्याचा उपक्रम राबवल्यानंतर याही वर्षी ठिकठिकाणी ३० हजार कडुनिंबाच्या बियांचे रोपण करण्याची अभिनव कल्पना राबवुन निसर्गाचा होणारा ऱ्हास थांबवण्याचा मानवतेला संदेश देत तसेच दिवंगत वारकऱ्यांचे संस्मरण व त्यांच्याबद्दल कृतज्ञता भाव ठेवत टाळ मृदुंगाच्या गजरात वारकरी पंढरीकडे निघाले.

दिंडीचे यंदाचे हे ३३ वे वर्ष आहे. दिंडीमध्ये महिला-पुरुष असे शंभरहुन अधिक वारकरी सहभागी झाले आहेत.

सद्गुरू श्री ज्ञानेश्वर सेवा मंडळाचे अध्यक्ष सुरेश उत्तम चंद रांका, उपाध्यक्ष राजेंद्र गायकवाड, बाळासाहेब मांढरे, सचिव रवींद्र रावसाहेब खर्डे, विकास बिलबिले, एकनाथ शेळके, प्रसाद गोंदकर, सुनील कवडे आदी वारकऱ्यांनी दिंडीचे आयोजन केले जाते.




### गणेश राका वारीत सहभागी

डॉ. सोनल बापूसाहेब गाढे, डॉ. प्रीती गांधी, डॉ. शमा लोढा यांचे त्यासाठी सहकार्य लाभले आहे. कोल्हार येथील तरुण वारकरी युवा उद्योजक गणेश राका यांचे देखील या वारीत सहभागी होण्याचे यंदाचे हे तिसरे वर्ष आहे.

### ३० हजार कडुलिंबाच्या बियांचे रोपण

वारी मार्गात ३० हजार कडुनिंबाच्या बियांचे रोपण करणार असून गेल्यावर्षी चिंचुक्यांची रोपण केले होते. वयाची ९० ही पार केलेले कोल्हार जेष्ठ वारकरी निवृत्ती पाटीलबा कापसे यांना पुष्पहार घालून त्यांचे आशीर्वाद घेतले.आषाढी एकादशीला आळंदी ते पंढरपूर असा ३०० कि.मी प्रवास करत वारकरी पांडुरंगाच्या चरणी माता टेकविणार आहेत.

# राहुरी फॅक्टरी येथील व्हॉलीबॉल मैदान परिसरात वृक्षारोपण

**जनता आवाज वृत्तसेवा**

**राहुरी फॅक्टरी** : पर्यावरण संवर्धनासाठी एक व्यक्ती, एक झाड उपक्रमातंर्गत जिल्हा क्रीडा कार्यालय, मेरा युवा भारत व उमेद सोशल फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यम ाने राहुरी फॅक्टरी येथील व्हॉलीबॉल मैदान परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. या अभियानात सहभागी झालेल्या विद्यार्थी व खेळाडूंना रोपांचे वाटप करुन घराच्या परिसरात लावण्याचे व त्याचे संवर्धन करण्याचे आवाहन करण्यात आले.

या उपक्रमाचे आयोजन फाउंडेशनचे उपाध्यक्ष व शाखाप्रमुख कुणाल तनपुरे यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आले होते. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून साई आदर्श मल्टीस्टेटचे संस्थापक शिवाजी कपाळे,



व्हॉलीबॉल प्रशिक्षक राजेंद्र पुजारी, फाउंडेशनचे जनसंपर्क अधिकारी बाळासाहेब सगळगीळे, कार्यकारी अधिकारी राजेश मंचरे, संघटक श्रीकांत राऊत, ज्ञानेश्वर माने, संदीप पंडित आदी उपस्थित होते.

कुणाल तनपुरे यांनी फाउंडेशनच्या माध्यमातून गरजू घटकातील विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक साहित्य वाटप, आरोग्य शिबिरे, महिला सक्षमीकरण, तसेच पर्यावरण संवर्धनासाठी विविध प्रकल्प राबवले जात असल्याचे सांगून, विविध सामाजिक उपक्रमांची माहिती दिली. बाळासाहेब सगळगीळे यांनी विद्यार्थ्यांना वृक्षांचे पर्यावरणीय, औषधी व सामाजिक महत्त्व समजावून सांगितले.

या उपक्रमासाठी जिल्हा क्रीडा अधिकारी ज्ञानेश्वर खुरंगे, क्रीडा अधिकारी भाऊराव वीर, राज्य क्रीडा मार्गदर्शक प्रवीण कोंढावळे, प्रियंका खिंडारे, जय असोसिएशनचे अध्यक्ष ॲड. महेश शिंदे, उमेद फाउंडेशनचे अध्यक्ष अनिल साळवे, सचिव सचिन साळवी, खजिनदार संजयजी निर्मळ, प्रमुख सल्लागार ॲड. दीपक धीवर यांचे मार्गदर्शन लाभले.

# रस्त्याचे काम करा अन्यथा जनआंदोलन : शिंदे

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : कल्याण रोड अनुसया नगर महालक्ष्मी लॉन जवळील रस्ता ठेकेदाराने काम करण्यासाठी गेल्या दोन महिन्यापूर्वी खोदून ठेवला, त्यानंतर रस्त्याचे काम बंद झाले. हा रस्ता अनुसया नगर, विद्या कॉलनी, आनंद पार्क या परिसराला जोडणारा मुख्य रस्ता आहे. त्यामुळे या परिसरातील राहणाऱ्या नागरिकांचा दळणवळणाचा प्रश्न निर्माण झाला आहे.

तर नागरिकांना खूप लांबून विळखा घालून जावे लागते, ठेकेदाराचे मनमानी पद्धतीने काम सुरू आहे. या कामाचा दर्जा देखील निकृत्ष्ट आहे, महापालिका प्रशासनाचे देखील याकडे अक्षरशा दुर्लक्ष असल्यामुळे ठेकेदाराने काम बंद केले आहे. खोदलेल्या रस्त्यामुळे नागरिकांना वाहतुकीसाठी अडचण निर्माण होत असून दररोज या ठिकाणी छोटे-मोठे अपघात देखील होत आहे.

तरी महापालिकेने दोन दिवसात रस्त्याचे काम सुरू न केल्यास आयुक्त यांच्या दालनात तीव्र स्वरूपाचे आंदोलन केले जाईल, असा इशारा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे ॲड. युवराज शिंदे यांनी दिला आहे. कल्याण रोड अनुसया नगर परिसरातील ठेकेदाराने खोदून ठेवलेल्या रस्त्याची राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने पाहणी करताना. ॲड. युवराज शिंदे समवेत अरुण ढाकणे, गणेश अमराळे, राजेंद्र पाडाळे, विराज ताक, सुधाकर बोल्ली, रवी मैड, गणेश बेरड, शेषराव आगळे, विवेक खोले, संकेत डोके आदी उपस्थित होते.

# माझ्या सामाजिक, राजकीय जीवनात पत्रकारांचे योगदान

## आ. अमोल खताळ; व्हाईस ऑफ मीडियाच्या वतीने पत्रकारांच्या पाल्यांना शालेय साहित्याचे वाटप

**जनता आवाज वृत्तसेवा**

**संगमनेर** : पत्रकार हा जनसामान्य माणसाचा आधारस्तंभ आहे. माझ्या सामाजिक, राजकीय जीवनामध्ये पत्रकारांचे योगदान महत्त्वाचा आहे. तर मी आमदार होण्यात पत्रकारांचेही योगदान महत्त्वाचे आहे. त्यामुळे त्यांचे कुटुंब हे माझे कुटुंब आहे, असे समजून कायमस्वरूपी पत्रकारांच्या पाठी मागे भक्कमपणे उभे राहणार असल्याची ग्वाही आ. अमोल खताळ यांनी दिली.

> संगमनेर शहरात एक पत्रकार भवन व्हावे, यासाठी यापूर्वीच आपण आमदार निधीतून दहा लाख रुपये देणार असल्याचे जाहीर केले आहे. मात्र आता जागेचा प्रश्न बाकी राहिला आहे. दोन ठिकाणी जागा निदर्शनास आलेल्या आहेत. त्यातील एक जागा पत्रकार भवनासाठी उपलब्ध करून देण्याबाबतचे निर्देश आपण नगरपालिकेच्या मुख्याधिकाऱ्यांना दिले असून पत्रकार भवन लवकरात लवकर उभे करण्यासाठी आपण प्रयत्न करत आहोत.
>
> **– अमोल खताळ, आमदार**

पत्रकारांचे कर्तव्य जरी समाजासाठी असलं तरी त्यांच्या कुटुंबाची जबाबदारी ही तितकीच महत्त्वाची आहे. या जाणिवेतून व्हॉइस ऑफ मीडिया या आंतरराष्ट्रीय स्तरावरील संघटनेच्या माध्यमातून आ. अमोल खताळ यांच्या हस्ते पत्रकारांच्या पाल्याचा शालेय साहित्य देऊन गौरव करण्यात आला. त्यावेळी आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.



यावेळी व्यासपीठावर व्हाईस ऑफ मीडियाचे जिल्हाध्यक्ष गोरक्षनाथ नेहे, तालुकाध्यक्ष गोरक्षनाथ मदने, खजिनदार बाबासाहेब कडू, शहराध्यक्ष महेश पगारे, सचिव सचिन जंत्रे, कार्याध्यक्ष भारत रेघाटे , ज्येष्ठ पत्रकार संदीप वाकचौरे, संजय अहिरे, संघटनेचे पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी पत्रकारांच्या सर्व पाल्यांना आ. खताळ यांच्या माध्यमातून शालेय साहित्य वाटप करण्यात आले.

आ. खताळ म्हणाले की, संगमनेरमधील पत्रकार यांचा माझा अनेक वर्षापासून मैत्री आहे. त्यांनी मला येथून मागेही खूप मदत केली आहे. मी इथून पुढेही नक्कीच करतील, अशी मला आशा आहे.

पत्रकार हा समाजाचा आरसा आहे. मात्र आपल्या कुटुंबासाठी वेळ नसतो. मुलांच्या उज्वल भवित्यासाठी तसेच कौटुंबिक जबाबदारी देखील पार पाडावी, असं तालुकाध्यक्ष बाबासाहेब कडू म्हणाले.

पत्रकारांच्या कुटुंबातील मुलं ही समाजाच्या सक्षम भवितव्यासाठीची बीज आहेत. त्यांना प्रोत्साहन देणे ही सामाजिक जबाबदारी असल्याचे मनोगत जिल्हाध्यक्ष गोरक्षनाथ मदने यांनी व्यक्त केले.

# यंदाच्या शैक्षणिक वर्षात शाळांना १२८ दिवस सुट्ट्या

## यादी जाहीर, कोणत्या महिन्यात किती सुट्ट्या?

**जनता आवाज वृत्तसेवा**

**आहिल्यानगर** : पहिली ते दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी एक महत्त्वाची बातमी समोर येत आहे, ती म्हणजे महाराष्ट्र राज्य शासनाच्या शालेय शिक्षण विभागाकडून शैक्षणिक वर्ष २०२५ - २६ मधील शाळांच्या सुट्ट्यांची यादी जाहीर करण्यात आली आहे. राज्यातील शालेय विद्यार्थ्यांसाठी एक महत्त्वाची बातमी समोर येत आहे ती म्हणजे महाराष्ट्र राज्य शासनाच्या शालेय शिक्षण विभागाकडून शैक्षणिक वर्ष २०२५ २६ मधील सुट्ट्यांची यादी प्रकाशित करण्यात आली आहे. या यादीनुसार या शैक्षणिक वर्षात राज्यातील शाळांना एकूण १२८ दिवस सुट्ट्या राहणार आहे.

यामध्ये ५२ रविवार आणि इतर ७६ सुट्ट्या राहणार आहेत. इतर ७६ सुट्ट्यांमध्ये दिवाळी



आणि उन्हाळी सुट्ट्या समाविष्ट आहेत. दिवाळी आणि उन्हाळी काळात एकूण ४८ दिवस सुट्ट्या राहणार आहेत.

### अशा मिळणाऱ्या सुट्ट्या?

जुलै महिन्यात आषाढी एकादशी, मोहरम आणि नागपंचमी अशा एकूण तीन सुट्ट्या राहणार आहेत. ऑगस्ट महिन्यात रक्षाबंधन, स्वातंत्र्य दिन आणि गणेश चतुर्थी निमित्ताने शाळांना सुट्टी राहणार आहे.

# मुलीचा खून करुन स्वत:लाही संपविले

## पोलीस बापाने एवढे टोकाचे पाऊल का उचलले?

**जनता आवाज वृत्तसेवा**

**नाशिक** : नाशिकरोड परिसरातील जेलरोड येथे कौटुंबिक वादातून एका पोलीस अंमलदाराने आपल्या सहा वर्षीय मुलीचा गळा आवळून खून केला आणि नंतर स्वतः गळफास घेऊन आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना घडली. या घटनेने संपूर्ण शहरात खळबळ उडाली असून, पोलीस दलातही शोककळा पसरली आहे.

मृत पोलीस अंमलदाराचे नाव स्वप्निल गायकवाड (वय ३४, रा. योगमळा, मॉडेल कॉलनी) असे आहे, तर त्याच्या मुलीचे नाव भैरवी (वय ६) आहे. ही घटना मंगळवारी (२४ जून




२०२५) सायंकाळी साडेसहाच्या सुमारास उघडकीस आली. स्वप्निल हा उपनगर पोलीस ठाण्यात शिपाई म्हणून कार्यरत होता. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दीड वर्षांपूर्वी स्वप्निलचा दुचाकी अपघात झाला होता, ज्यामुळे त्याच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली. काही काळ तो कोमात होता. प्रकृतीत सुधारणा झाल्यानंतर त्याच्या कुटुंबात वादविवाद सुरू झाले.

स्वप्निलने प्रेमविवाह केला होता, परंतु गेल्या काही महिन्यांपासून त्याच्या पत्नीशी सतत भांडणे होत होती. यामुळे त्याची पत्नी वेगळी राहत होती, तर भैरवी स्वप्निलसोबत राहत होती. कौटुंबिक कलह आणि आजापणामुळे नैराश्यग्रस्त झालेल्या स्वप्निलने टोकाचे पाऊल उचलले असावे, असा पोलिसांचा प्राथमिक अंदाज आहे.

या घटनेपूर्वी स्वप्निलने कोणतीही चिठ्ठी लिहिली आहे का, याचा शोध पोलीस घेत आहेत. यापूर्वी एप्रिल महिन्यात नाशिकमध्येच मुरलीधर जोशी या निवृत्त प्राध्यापकाने पत्नीचा खून करून आत्महत्या केली होती. त्यांनी आत्महत्येपूर्वी एक चिठ्ठी लिहिली होती, ज्यामुळे आता स्वप्निलच्या बाबतीतही अशी चिठ्ठी किंवा मेसेज आहे का, याचा तपास सुरू आहे.

# बदलत्या जगाकडे पहात दक्ष राहण्याची गरज

## पोलिस अधिक्षक घार्गे; मराठा समाजातील गुणवंतांचा सत्कार

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीरामपूर** : एआय (कृत्रिम बुद्धीमत्ता) मुळे जग झपाट्याने बदलत आहे. पूर्वी १० वर्षांनी काय होईल, हे सांगता येवू शकत होते. आता वर्षभराने काय होईल, हे कोणी सांगू शकत नाही. त्यामुळे डोळ्यात तेल घालून, डोळे उघडे ठेवून बदलत्या जगाकडे पहात दक्ष राहण्याची गरज असल्याचे प्रतिपादन जिल्हा पोलीस अधिक्षक सोमनाथ घार्गे यांनी केले आहे.

अखंड मराठा समाजाच्यावतीने आयोजित करण्यात आलेल्या स्पर्धा परिक्षेसह इतर क्षेत्रातील २१ गुणवंतांचा गौरव समारंभ पार पडला. त्यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून सोमनाथ घार्गे बोलत होते. अध्यक्षस्थानी रयत शिक्षण संस्थेच्या जनरल बॉडी सदस्या मिनाताई जगधने या होत्या. यावेळी अप्पर पोलीस अधिक्षक वैभव कलुबर्मे, पोलीस उपधिक्षक



डॉ. बसवराज शिवपुजे, मुख्याधिकारी मच्छिंद्र घोलप, पोलीस निरीक्षक नितीन देशमुख यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. घार्गे म्हणाले, सध्या प्रत्येकाच्या हातात मोबाईल आहे. मोबाईल हा आता दुष्मन झाला आहे. ज्यांना स्पर्धा परिक्षेत यश मिळवायचे असेल त्यांनी मोबाईल बाजुला ठेवून अभ्यास केला तर शक्य आहे. मोबाईलने लोकांमध्ये भ्रम निर्माण केला आहे. मोबाईल नसला तर आभाळ कोसळेल, असे वाटते; परंतु ते खोटे आहे. प्रस्ताविक ॲड. बाळासाहेब आगे यांनी केले. यावेळी न्यायाधीश पदी निवड झालेल्या ॲड. कोमल चौधरी, डॉक्टर पूजा गागरे, पोलीस उपनिरीक्षक शुभम घोलप यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

अध्यक्षीय भाषणात मिनाताई जगधने म्हणाल्या, अखंड मराठा समाजाने सर्व जाती धर्मातील गुणवंत विद्यार्थ्यांचा जो सत्कार केला तो कौतुकास्पद आहे. समाजातील एकोपा वाढीसाठी अशा कार्यक्रमांची निश्चित आवश्यकता आहे. एआय तंत्रज्ञानामुळे शेतीचे उत्पादन वाढणार असून खर्च कमी होणार आहे. रयतमध्ये शिकणाऱ्या ११ हजार विद्यार्थ्यांपैकी ८० टक्के विद्यार्थी हे शेतकरी कुटुंबातील आहेत. त्यामुळे जुलैपासून ५ वी च्या वर्गापासून एआयचे शिक्षण रयत शिक्षण संस्थेमध्ये दिले जाणार आहे.

# संत तेरेसा हायस्कूलमध्ये योगदिन उत्साहात साजरा

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीरामपूर** : हरेगाव येथील संत तेरेसा गर्ल्स हायस्कूलमध्ये जागतिक योग दिन मोठ्या उत्साहात आणि शिस्तबद्ध पद्धतीने साजरा करण्यात आला.

विद्यार्थिनींमध्ये आरोग्य जागृती आणि योगाचे महत्व पटवून देण्यासाठी शाळेच्या वतीने विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक आणि शाळेच्या मुख्याध्यापिका सिस्टर ज्योती यांनी विद्यार्थिनींना योग दिनाचे महत्व पटवून दिले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन सुहास ब्राह्मणे यांनी केले. विद्यार्थिनींनी विविध योगासने, प्राणायाम आणि ध्यान सादर करत उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले. कार्यक्रमामध्ये क्रीडाशिक्षक नितीन बलराज यांनी योगासने, त्यांची शास्त्रीय माहिती आणि त्याचे शारीरिक-मानसिक



फायदे याबद्दल मार्गदर्शन केले. त्याचबरोबर वरिष्ठ शिक्षिका विजया क्षीरसागर यांनी योग दिनाच्या निमित्ताने विद्यार्थिनींना सकारात्मक विचारसरणी, मन:शांती आणि आरोग्यपूर्ण जीवनशैलीचे महत्व समजावून सांगितले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सर्व शिक्षक-शिक्षिका, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थिनींचे मोलाचे योगदान लाभले.

# महसूल मंडलनिहाय समाधान शिबिरांचे आयोजन

**जनता आवाज वृत्तसेवा**



**संगमनेर** : संगमनेर तालुक्यातील नागरिकांच्या विविध शासकीय गरजा एकाच ठिकाणी पूर्ण करण्यासाठी आ. अमोल खताळ यांच्या मार्गदर्शनाखाली महसूल विभागाच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज समाधान शिबिर योजने अंतर्गत विविध दाखले देण्यासाठी तालुक्यातील मंडल निहाय समाधान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. संगमनेर विधानसभा मतदारसंघातील सर्वसामान्य नागरिक, शेतकरी, विद्यार्थी, महिला संगमनेरला येण्याची गरज न पडता त्यांच्या गावाजवळच या समाधान शिबिराच्या माध्यमातून विविध प्रमाणपत्रे शासकीय योजनांचा लाभ मिळणार आहे या शिबिरातून नागरिकांना उत्पन्नाचा जातीचा रहिवास, नॉन क्रिमिलिअर हे सर्व दाखले तसेच शिधापत्रिका (नवीन/दुबार), रेशन कार्ड, अन्न सुरक्षा योजना, अंत्योदय योजना, मतदार नोंदणी, फेर फार अर्ज, निवडणूक ओळखपत्र, आधार अपडेशन, पीएम मातृ वंदना योजना, पीएम कृषी सिंचन योजना, मका बियाणे वाटप, किसान कार्ड, स्तनदा माता वैद्य कीय तपासणी अशा विविध सेवाउपलब्ध होणार आहेत. वर्षभरातून दोन वेळा सर्व महसूल मंडळांत या शिबिरांचे आयोजन करण्यात येणार आहे.या शिबिराचा सर्वच नागरिकांना तसेच विद्यार्थ्यांना लाभ घेता यावा यासाठी महायुतीचे पदाधिकारी व कार्यकर्ते यांनी जनजागृती करावी या समाधान शिबिराचा सर्वांनी लाभ घ्यावा असे आवाहन महायुतीच्या वतीने करण्यात आले आहे.

# पोहेगाव गावठाणात वीजपुरवठा विस्कळीत

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोपरगाव** : तालुक्यातील पोहेगाव गावठाण परिसरातील नागरिक आणि व्यावसायिक सध्या अपुरा आणि कमी दाबाने होणाऱ्या वीजपुरवठ्यामुळे प्रचंड त्रस्त झाले आहेत. वारंवार खंडित होणाऱ्या विजेमुळे दैनंदिन जीवन विस्कळीत झाले असून, याचा सर्वाधिक फटका स्थानिक व्यावसायिकांना बसत आहे.

सातत्याने होणाऱ्या वीजखंडामुळे व्यापाऱ्यांचे फ्रीज, डीफ्रीझर, थंड पाण्याच्या मशीन, आइस्क्रीम, ताक, दही आणि कुल्फी यासारखे पदार्थ खराब होत आहेत. ग्राहकांची संख्याही घटत चालली असून, उत्पन्नावर थेट परिणाम होत आहे. स्थानिक व्यापारी म्हणाले, सध्या दररोज वीज २-३ वेळा जात आहे. आम्ही जो माल थंड ठेवतो तो खराब होतो. ग्राहक परत जातात आणि रोजचं नुकसान होत आहे. दिलीप सोनवणे यांनी सांगितले, घरात सध्याच्या उकाड्यात पंखा, फ्रीज, टीव्ही काही चालत नाही. लहान मुले आणि वृद्ध व्यक्तींना त्रास सहन करावा लागतो. वीज खात्याच्या कार्यालयात अधिकारी सतत अनुपस्थित असतात. आम्ही तक्रार तरी कुणाकडे करायची? दुसरीकडे, शालेय विद्यार्थ्यांचे अभ्यासाचेही नुकसान होत असल्याचे निरीक्षण आहे. अभ्यास करताना लाईट अचानक जाते आणि पुन्हा येण्यास तासाभराची वाट बघावी लागते, अशी तक्रार पालकांनी नोंदवली आहे. गावातील अनेक व्यापाऱ्यांनी आणि नागरिकांनी एकत्र येत प्रशासनाकडे तातडीने लक्ष घालण्याची मागणी केली आहे. विजेचा प्रश्न सुटला नाही तर व्यापाऱ्यांची कंबर मोडेल आणि नागरिकांचा संयम सुटेल, स्थानिक अधिकारी कार्यालयात उपस्थित राहत नसल्याचा आरोप सातत्याने होत आहे. अधिकारी फोनही उचलत नाहीत. तक्रार करायची कुणाकडे? असा सवाल दादासाहेब औताडे, यांनी उपस्थित केला.

# सावता महाराजांच्या जयघोषात दिंडीचे प्रस्थान

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पाथर्डी** : संतश्रेष्ठ श्री सावता महाराज मंदिर, कसबा येथून पंढरपूर आषाढी वारीसाठी पायी दिंडीने मंगळवारी (दि. २४) सकाळी विठ्ठलनामाच्या गजरात प्रस्थान केले. दिंडीचा प्रारंभ शंकर बाबा भक्ती मठाचे माधव बाबा व रमेश गिरी महाराज यांच्या हस्ते करण्यात आला.

दिंडीप्रमुख मोहन महाराज सुडके, तसेच विणेकऱ्यांचे पूजन माजी नगरसेवक रमेश गोरे आणि सुरेखा गोरे यांच्या हस्ते पार पडले. यावेळी लक्ष्मण डोमकावळे, बंडू पाटील बोरुडे, सोन्याबापु बोरुडे, शिवाजी बालवे,



ज्ञानदेव बालवे, राजेंद्र दुधाळ, गणेश सोनटक्के, राजेंद्र सोनटक्के, बाळासाहेब सोनटक्के,दीपक गादे, सिंधू तुपे, द्वारका बालवे, सुमिना काकडे, विनोद चन्ने, रमेश साखरे, भाऊसाहेब साखरे, दत्तात्रेय आमले, पोपट नरोटे आदी उपस्थित होते. दरवर्षीप्रमाणे विविध दात्यांच्या अन्नदान व आर्थिक मदतीतून दिंडीचे आयोजन करण्यात आले. वारकरी संप्रदायाची भगवी पताका घेऊन हजारो भाविक विठ्ठल नामाच्या जयघोषात पाथर्डी शहरातून निघाले.

### असा असेल दिंडीचा मार्ग

अहिल्यानगर, छत्रपती संभाजीनगर, बीड, पाथर्डी शहर व पंचक्रोशीतील भाविक सहभागी झालेल्या या दिंडीचा अकरा दिवसांचा पायी प्रवास पंढरपूर येथे संपन्न होणार आहे. शहरातील सर्वात मोठी पायी दिंडी म्हणून या दिंडीस विशेष ओळख आहे.


# भंडारदार धरणात ४६ टक्के पाणीसाठा

## पाणलोटात पावसाचा जोर मंदावला

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अकोले** : उत्तर नगर जिल्ह्याला वरदान ठरलेल्या भंडारदरा धरण पाणलोटक्षेत्रात पावसाचा जोर काहीसा मंदावला असला तरी धरणात पाण्याची आवक सुरू आहे. त्यामुळे मंगळवारी सायंकाळी सहा वाजता ११०३९ दलघफू क्षमतेच्या भंडारदरा धरणाचा पाणीसाठा ५०६८ दलघफू (४६. टक्के) तर निळवंडेचा ३३९१ दलघफू (४१. टक्के) झाला आहे.

यंदा मान्सूनचे लवकरच आगमन झाले आहे. तेव्हापासून पाऊस सुरू असल्याने अजूनही खरिपाच्या पेरण्या खोळंबलेल्या आहेत. काही जणांनी अवकाळी पाऊस झाल्यानंतर पेरण्या केल्या होत्या. त्यांच्यावर आता दुबार पेरणीचे संकट ओढावलेले आहे. भात लागवडीसाठी लागणार पाऊस अद्यापही झालेला नाही. मुळा नदीचा प्रवाह टिकून अकोले तालुक्यातील मुळा पाणलोटक्षेत्रात



पावसाचा जोर मंदावला असला तरी अधूनमधून हलक्या व मध्यम स्वरूपाच्या सरी कोसळत आहे. यामुळे मुळा नदीचा प्रवाह टिकून आहे. गेल्या आठ दिवसांपासून मान्सून चांगलाच सक्रिय झाल्यानंतर मुळा नदी वाहू लागली आहे. पाणलोटक्षेत्रातील आंबित, शिरपुंजे, पिंपळगाव खांड येथील धरणे भरून मुळा धरणाकडे आवक सुरू आहे.

# अशोक ग्रुप ऑफ स्कूलमध्ये योगा दिन संपन्न




**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीरामपूर** : अशोक उद्योग समूहाचे सूत्रधार माजी आ.भानुदास मुरकुटे यांच्या मार्गदर्शनाखाली व अशोक ग्रामीण शिक्षण संस्थेच्या कार्यकारी अधिकारी सौ.मंजुश्रीताई मुरकुटे यांच्या नेतृत्वाखाली अशोक इंग्लिश मीडियम स्कूल व जुनिअर कॉलेज आणि अशोक आयडियल स्कूल, प्रगतीनगर येथे योग दिन साजरा करण्यात आला.

याप्रसंगी प्रमुख अतिथी योगगुरु अनिल कुलकर्णी यांनी उपस्थितांना योगाचे महत्व सांगितले. तसेच योगाच्या विविध आसनांचे प्रात्यक्षिक करून दाखवले. अध्यक्षीय भाषणात सौ.मंजुश्रीताई मुरकुटे यांनी योगा हा जीवनाचा अविभाज्य भाग असून शरीर व मन तंदुरुस्त राहण्यासाठी योगा अत्यावश्यक असल्याचे सांगत विद्यार्थ्यांनी योगा दररोज करावा, असे आवाहन त्यांनी केले.


यावेळी विद्यार्थ्यांनी योगावर आधारित काही नृत्यगीतांचे सादरीकरण केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य रईस शेख यांनी केले. पाहुण्यांचा परिचय नितु गायकवाड यांनी करून दिला, तर आभार प्रदर्शन आवेज बागवान यांनी केले. याप्रसंगी अशोक ॲग्रो इंडस्ट्रीज, एज्युकेशन, ॲड. डेव्हलोपमेंट फौंडेशनचे उपाध्यक्ष बाबासाहेब आदिक, 'अशोक'चे संचालक निरज मुरकुटे, प्राचार्य संपत देसाई आदी उपस्थित होते.

# नाफेडमार्फत होणारी कांदा खरेदी रद्द करा

## स्वतंत्र भारत पक्षाचे अध्यक्ष अनिल घनवट; घोटाळे बाजांसाठी गुपचूप कांदा खरेदी

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : महाराष्ट्रात नाफेड व एनसीसीएफ मार्फत होणारी कांदा खरेदी शेतकऱ्यांच्या हितासाठी नाही तर घोटाळा करणाऱ्या काही सोकावलेल्या बोक्यांसाठीची आहे. यामुळे गुपचूप सुरू केलेली कांदा खरेदी तातडीने बंद करावी, अशी मागणी स्वतंत्र भारत पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष अनिल घनवट यांनी ग्राहक व्यवहार मंत्रालय, नाफेड आणि एनसीसीएफचे चेअरमन व कार्यकारी संचालकांकडे केली आहे. महाराष्ट्रात नाफेड व एनसीसीएफमार्फत कांदा खरेदी सुरू



करण्यात आली असल्याचे सांगण्यात आले.

सदरची खरेदी मुल्य स्थिरीकरण निधी योजने अंतर्गत होणार आहे. राज्यातून सुमारे तीन लाख टन कांदा खरेदी केला जाणार आहे. अशा प्रकारे कांदा खरेदी सुरू करतांना त्याबाबतची माहिती सार्वजनिक केली जाते. कोणत्या एजन्सीला किती कांदा खरेदी करायचा आहे, कोणत्या ठिकाणी खरेदी होणार आहे, खरेदीचा दर काय असणार आहे, या सर्व बाबी आगोदर जाहीर केल्या जातात. परंतु या वेळेस ही माहिती सार्वजनिक केलेली नाही. कांदा खरेदी करणाऱ्या एजन्सीची नावे जाहीर केली जात नाही. एकूण नाफेडच्या कारभाराबाबत प्रचंड गोपनीयता पाळली जात आहे.

### नाफेडची खरेदी कोणाच्याच कामाची नाही

नाफेड व एनसीसीएफमार्फत होणारी खरेदी ना शेतकऱ्यांच्या हिताची आहे, ना ग्राहकाच्या. यात फक्त कांदा खरेदी करणाऱ्या संस्था, नाफेड-एनसीसीएफचे अधिकारी व पुढारी पैसे कमवत आहेत. आता कमी दरात खरेदी केलेला कांदा, तेजीच्या काळात पुन्हा बाजारात ओतून कांद्याचे भाव पाडण्याचा सरकारचा कार्यक्रम असतो. या वर्षी कांदा खरेदीचे दर बाजार भावा पेक्षा कमी आहेत. त्यामुळे खुल्या बाजारातील दर कमी होण्याची शक्यता आहे. नाफेड कांदा खरेदी करणार आहे. म्हणून नेहमीच्या सारवलेल्या एजन्सीजने अगोदरच स्वस्तात कांदा साठवून ठेवला आहे.

# कॅलिडोस्कोप

## झीलँडिया : पृथ्वीवरचा आठवा खंड



**पृथ्वीवर सात खंड असल्याचं आपण भूगोलात शिकलो असलो तरी या भूतलावर आठव्या खंडाचं अस्तित्वही आहे. झीलँडिया हाच तो आठवा खंड. श्रीकृष्णाची द्वारका समुद्रात बुडाली तसाच झीलँडियाही प्रशांत महासागरात दडून बसला. या खंडाचा बहुतांश भाग प्रशांत महासागराच्या खाली आहे. म्हणूनच झीलँडियाला पृथ्वीवरचा हरवलेला खंड असं म्हटलं जातं.**

## जमिनीखालचं गाव!

जगभरात अनेक चित्रविचित्र ठिकाणं आहेत. त्यांच्याबद्दल जाणून घेतल्यावर आपले डोळे विस्फारतात. काही ठिकाणं निसर्गाचा चमत्कार असतात तर काही मानवनिर्मित. अमेरिकेतलं असंच एक गाव पर्यटकांच्या आकर्षणाचं केंद्र ठरलं. ते जमिनीखाली वसलं आहे. आपण भुयारी रेल्वे, मेट्रोबद्दल ऐकून आहोत. परदेशात अशा रेल्वे कार्यरत आहेत. पण संपूर्ण गावच जमिनीच्या खाली असणं हा प्रकार भन्नाटच म्हटला पाहिजे. 'सुपाई' असं या जमिनीखालच्या गावाचं नाव! ते जमिनीपासून तब्बल तीन हजार फूट खोल वसलं आहे. जगभरातून दरवर्षी जवळपास ५५ लाख लोक 'सुपाई'ला भेट द्यायला येतात. लोकसंख्या खूप कमी असली तरी पर्यटकांमुळे ते कायम गजबजलेलं असतं.



अमेरिकेतल्या 'ग्रँड कॅनियन' जवळच्या हवासू भागातल्या खोल दरीत 'सुपाई' वसलं आहे. या ठिकाणी अवघे २०८ लोक राहतात. अमेरिकेतले मूळ निवासी असणारे 'रेड इंडियन्स' इथले नागरिक आहेत. अमेरिकेसारख्या जागतिक महासत्ता असणाऱ्या देशातलं हे गाव आधुनिक सोयीसुविधांपासून मात्र वंचित आहे. इथे येण्यासाठी बरीच पायपीट करावी लागते किंवा खेचरावर बसून प्रवास करावा लागतो. इकडे एखाद-दुसरं विमानच येतं. अशा या गावात जाण्यासाठी अंगी धाडस आणि इच्छाशक्ती असायला हवी

## स्टंटबाज ॲरॉन

व्हिलचेअरवर दिवस काढणाऱ्या व्यक्तींबद्दल आपल्याला सहानुभूती वाटते. अपंगत्वामुळे बऱ्याच जणांना आयुष्यभर व्हिलचेअर जवळ करावी लागते. पण या परिस्थितीचा फारसा बाऊ न करणारे लोकही असतात. ॲरॉन फोथरिंगम अशांपैकीच एक. तरूण मंडळी मोटरसायकलचे स्टंट करतात. ट्रेनच्या दारात



उभे राहणारेही चर्चेत असतात. पण ॲरॉन व्हिलचेअरवर बसून स्टंट करतो. तो व्हिलचेअर ३६० अंशात अगदी सहजपणे फिरवतो. अशा कसरती दाखवून त्याने बऱ्याच स्पर्धांमध्ये विजेतेपदं पटकावली आहेत. या धाडसी मुलाचे कारनामे बघून आपण आश्चर्यचकित होतो. त्याचं कौतुक करण्यासाठी शब्दही अपुरे पडतात. ॲरॉनचा हा प्रवास अनेकांसाठी प्रेरणादायी ठरू शकतो. पाठीच्या कण्याशी संबंधित दोष घेऊन जन्माला आलेल्या ॲरॉनने जिद्दीने या अपंगत्त्वावर मात के ली. सुरूवातीला तो कुबड्या वापरत असे. त्याने वयाच्या आठव्या वर्षापासून व्हिलचेअर वापरायला सुरूवात केली. त्याचा भाऊ बीएमएक्सवर स्टंटबाजी करत असे. त्याच्याकडूनच ॲरॉनला प्रेरणा मिळाली. बीएमएक्स ट्रॅकचा वापर करायला सुरूवात केल्यानंतर त्याने कधीही मागे वळून पाहिलं नाही. त्याने स्टंटबाजीच्या बऱ्याच स्पर्धा गाजवल्या. तो रिॲलिटी शोमध्येही सहभागी झाला होता. त्याने एका मालिकेतही काम केलं. ॲरॉनच्या नावे बरेच विक्रम नोंदवले गेले आहेत.


## डोळे हे जुल्मी गडे...

डोळे हा माणसाच्या शरीरातला अत्यंत महत्त्वाचा आणि नाजूक अवयव. दृष्टी नसेल तर सृष्टी पाहता येत नाही. परमेश्वराने माणसाच्या शरीराची रचना करताना प्रत्येक गोष्टीचा नीट विचार केला आहे. आपल्या सर्व अवयवांचं कार्य नित्यनेमाने सुरू असतं. डोळेही सातत्याने कार्यरत असतात. अशा या डोळ्यांबद्दलची रंजक माहिती जाणून घेऊ या.

✻ डोळ्यांच्या विकासाची सुरूवात तब्बल ५५० दशलक्ष वर्षांपूर्वी झाल्याचं सांगितलं जातं. गर्भधारणा होऊन दोन आठवडे उलटल्यानंतर डोळ्यांचा विकास होऊ लागतो.

✻ भुवयांमुळे कपाळावरचा घाम डोळ्यात जात नाही तर पापण्यांमुळे धूळ आणि घाणीपासून या नाजूक अवयवाचं रक्षण होतं.

✻ डोळ्यांची रचना अनोख्या



पद्धतीने करण्यात आली असून चेहऱ्यावरच्या खोबणीत ते बसवण्यात आले आहेत.

✻ जन्मापासून मृत्यूपर्यंत बुब्बुळांच्या आकारात कोणताही बदल होत नसला तरी नाक आणि कानांचा आकार मात्र बदलत राहतो.

✻ माणसाच्या डोळ्याचं वजन एक औंसापेक्षाही कमी असतं.

✻ डोळ्यांना झालेली जखम खूप लवकर बरी होते.

✻ दृष्टीशी संबंधित ८० टक्के दोष टाळता येतात किंवा पूर्णपणे बरे होतात.

✻ मेंदूनंतर डोळा हा शरीराचा सर्वात गुंतागुंतीचा अवयव आहे.

✻ जगभरातल्या ५५ टक्के लोकसंख्येच्या डोळ्यांचा रंग भूरा आहे.

✻ जास्त वेळ वाचन केल्याने किंवा सातत्याने कॉम्प्युटर, स्मार्टफोनच्या स्क्रीनवर नजर खिळवल्याने डोळ्यांना थकवा येतो.

## नव्वद हजारात १५ दिवस स्टे!

प्रत्येकाला प्रवास करणे आवडते; परंतु काही वेळा लोक पैसे खर्च करण्यास टाळाटाळ करतात आणि त्यांच्या प्रवास योजना रद्द करतात. पण कमी पैशांमध्ये जास्त दिवस आणि जास्त ठिकाणी प्रवास करू शकाल, असा मार्ग सापडला तर त्यासारखे दुसरे भाग्य नाही.

अशीच एक पोस्ट सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल झाली. त्यात एक कुटुंब केवळ ९० हजार रुपयांमध्ये ११ दिवसांसाठी स्वित्झर्लंडच्या सहलीला गेले आणि तेथील २५ शहरांना भेट दिली, असा दावा केला गेला. केवळ ९० हजार रुपयांमध्ये २५ शहरांना भेट, खरे वाटत नाही ना? एका व्यक्तीने सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर दावा केला होता, की हे फक्त ९० हजार रुपयांमध्ये शक्य आहे. मेहुल शाहने आपली पोस्ट शेअर करून लिहिले, की कोणतीही ट्रॅव्हल एजन्सी तुम्हाला या मार्गावर नेणार नाही; परंतु आम्ही ११ दिवसांमध्ये स्वित्झर्लंडला २५हून अधिक शहरांसह प्रवास केला. चार बोट क्रूझसह, दोन प्रौढ आणि दोन मुलांच्या कुटुंबासाठी ९० हजार... शाह म्हणाले, की बेस सिटी म्हणून लॉसने शहर निवडले. मग सामूहिकरित्या एक ट्रिप केली. मॉन्ट्रो येथून



तुम्ही पॅनोरामिक गोल्डन पास ट्रेनमध्ये चढू शकता. हा मार्ग सुंदर आहे. आरक्षणाशिवायही तुम्हाला तिथे सहज जागा मिळेल, असेही ते सांगतात. स्विस पासमध्ये १० पेक्षा जास्त पॅनोरामिक गाड्यांचा समावेश होतो. त्यांनी सांगितले, की ४५-४५ हजार रुपयांना १५ दिवसांसाठी दोन स्विस ट्रॅव्हल पास मिळाले. यासोबतच त्यांना मोफत फॅमिली कार्ड मिळाले. त्यात १६ वर्षाखालील मुलांना मोफत प्रवासाची सुविधा उपलब्ध करून दिली गेली.

## अशी ही मनीमाऊ


मांजर हा आपल्या अवतीभोवती राहणारा आणि सहजतेने माणसाळणारा प्राणी. अनेक जण मांजर पाळतात. अत्यंत गोंडस अशा या प्राण्याच्या काही सवयी, लकबी मात्र विचित्र असतात. या प्राण्याला माणसांच्या भावभावनांची जाण असते. त्यांना मालकाच्या बऱ्यावाईट मूडची लगेच कल्पना येते. मांजर दिवसातले १६ तास झोपतं तर उरलेल्या आठ तासांमधला एक तृतीयांश वेळ स्वच्छतेत जातो. म्हणजे मांजर जवळपास तीन तास अंग चाटत बसतं. जगभरात जवळपास ६० कोटी पाळीव मांजरं असून माणसाने बारा हजार वर्षांपूर्वीपासून मांजर पाळायला सुरू केल्याचे पुरावे आढळले आहेत. टोकियो विद्यापीठातल्या शास्त्रज्ञांनी केलेल्या संशोधनानुसार मांजर आवाजावरून माणसाची ओळख पटवतं. आपण त्यांची खूप काळजी घेत असलो तरी त्यांना माणसांची फारशी फिकिर नसते. मांजराची ओळख पटवण्यासाठी नाकाचे ठसे घेतले जातात. परिस्थितीनुसार मनीमाऊ वेगवेगळ्या पद्धतीने आवाज काढते. या प्राण्यांचा मेंदू माणसाच्या मेंदूशी साधर्म्य साधतो. मांजर माणसांप्रमाणे स्वप्नं बघू शकतं. त्यांच्या शरीरावर अनेक परजीवींचा वास असतो. हे परजीवी माणसाच्या मेंदू आणि व्यवहारावर प्रभाव टाकतात, असं संशोधनांचं म्हणणं आहे. खाण्यापिण्याच्या बाबतीत मांजरं बरीच नाटकी असतात. ते आवडीचे पदार्थ मिटक्या मारत खातात. त्यांचे दुधाचे दात खूपच टोकदार असतात. जन्मल्यानंतर सहा महिन्यात ते पडतात आणि नवे दात येतात. जन्माच्या वेळी त्यांचे डोळे निळे असतात. नंतर रंग बदलत जातो.



## नितीशकुमार रिक्षाने सिनेमाला!

नितीशकुमारांबद्दल २००९ चा एक किस्सा सांगितला जातो. त्या वेळी नितीशकुमार यांना 'स्लमडॉग मिलेनियर' हा चित्रपट बघण्याची लहर आली. पण सिनेमागृहापर्यंत जाण्यासाठी कोणते साधन उपलब्ध होत नव्हते. अशावेळी ते चक्क सायकल रिक्षावर स्वार झाले आणि चित्रपट पाहायला गेले. एवढेच नव्हे तर सिनेमा इतका आवडला की, त्यांनी सर्वांना तो पाहण्याचे आवाहन केले.

नितीश कुमार यांचा हा किस्सा 'नितीश कुमार अंतरंग- मित्रांच्या नजरेतून' या पुस्तकात लिहिण्यात आला. निवडणूक आयोगाने दोन मार्च २००९ ला १५ व्या लोकसभा निवडणुकीच्या तारखा जाहीर केल्या. त्या वेळी पाटण्याच्या कोणत्या तरी सिनेमागृहात 'स्लमडॉग मिलेनियर' सिनेमा लागला होता. या सिनेमाला ऑस्कर पुरस्कार मिळाला होता. नितीश कुमारांना हा सिनेमा पाहण्याची लहर आली. पण निवडणूक तारखा जाहीर झाल्यानंतर आचारसंहिता लागू झाली. खासगी कामासाठी सरकारी वाहनाचा उपयोग केला जाऊ शकत नव्हता. नितीश




कुमार यांच्याकडे स्वत:च्या मालकीचे कोणते इतर वाहन नव्हते.

त्यांनी सिनेमाबद्दल इतकं ऐकलं होतं, की आता कधी जाऊन सिनेमा पाहतोय असं त्यांना झालं होतं. त्यामुळे सायकल रिक्षात बसून सिनेमागृहात पोहोचले. रिक्षातून जाऊन सिनेमा पाहणे हा नितीश कुमारांचा स्टंट असल्याची टीका त्या वेळी काही लोकांनी केली. यातून नितीश यांना किती प्रसिद्धी मिळाली माहिती नाही; पण तेव्हापासून 'स्लमडॉग मिलेनियर' चित्रपटाला प्रेक्षकांची गर्दी मात्र वाढू लागली होती.

## भाजी आणायला गेली, लखपती झाली

भाजी आणायला गेल्यावर सहज म्हणून लॉटरीचं तिकिट काढायचं आणि लखपती व्हायचं ही कल्पनाच किती छान आहे ना! पण प्रत्यक्षात असं कधी घडू शकतं का? अमेरिकेतल्या मेरीलँडची रहिवासी असणाऱ्या वनिस्सा नावाच्या महिलेच्या बाबतीत मात्र असं घडलं. भाजी आणायला गेलेल्या वनिस्साने गंमत म्हणून लॉटरीचं तिकिट काढलं आणि तिचं नशीब उघडलं. झालं असं की, कोबी आणायला गेलेल्या वेनिस्साला रस्त्यात लॉटरीचं दुकान दिसलं. आपणही लॉटरी काढून पाहू, असं




तिच्या मनात आलं. तिकिट काढून ती घरी आली. ते स्क्रॅच केल्यानंतर तिला आनंदाच्या उकळ्या फुटल्या. तिने सर्वाधिक रकमेची लॉटरी जिंकली होती. २,२५,००० डॉलर म्हणजे जवळपास १.५ कोटी रूपये तिला मिळाले होते. ही रक्कम एखाद्या चांगल्या पर्यायात गुंतवण्याचा तिचा विचार आहे. इतकंच नाही तर तिला 'डिस्ने वर्ल्ड' फिरायचं आहे. लॉटरीच्या माध्यमातून एवढी रक्कम जिंकणारी वेनिस्सा एकमेव नाही. केरळचा व्यावसायिक प्रवीण थॉमसनेही दुबई विमानतळावरच्या ड्युटी फ्री ड्रॉ मधून एक दशलक्ष डॉलर जिंकले होते. अशा पद्धतीने मालामाल होण्यासाठी नशीब मात्र जोरावर असायला हवं.

## ११ कोटींचं पुस्तक!

नव्या पिढीतील कित्येक जण समाज माध्यमांवर पडीक असतात. त्यातील थोडेच जण पुस्तक चाळतात, वाचतात. एकंदरच वाचन आवडणाऱ्यांची संख्या खालावलेली नाही; पण कमी मात्र नक्कीच झाली आहे. आजही अनेक जण बाहेर जाताना पुस्तक सोबत ठेवतात. प्रवासात अथवा निसर्गरम्य ठिकाणी पुस्तक वाचण्यासारखा दुसरा आनंद नाही. पण एखाद्या पुस्तकासाठी कोणी ११ कोटी रुपये मोजल्याचे तुम्हाला माहिती आहे का, आणि हे पुस्तक खरेदीसाठी कोणी खासगी विमानाने प्रवास करून आले, असेल यावर तुमचा विश्वास बसतो का? पण हे घडले आहे.

सध्या ही महागडी पुस्तक खरेदी जगभरात कौतुकाचा विषय ठरली आहे. हे पुस्तक १०० वर्षांपूर्वीचे असून ते लोकप्रिय अमेरिकन लेखक नेपोलियन हिल यांनी १९२५ मध्ये लिहिले होते. या पुस्तकाचे नाव 'द लॉ ऑफ सक्सेस' असे आहे. अमेरिकेतील इडाहो येथे राहणाऱ्या रसेल ब्रनसन या उद्योगपतीने या पुस्तकाची पहिली प्रत खरेदी केली. या प्रतीवर नेपोलियन यांची स्वाक्षरी आहे. रसेल यांना हे पुस्तक ऑनलाईन विक्री होणार असल्याची माहिती मिळाली. नेपोलियन यांच्या स्वाक्षरीची पहिली प्रत मिळत असल्याने त्यांना स्वतःला रोखता आले नाही आणि या पुस्तक खरेदीचा विचार पक्का केला.

या पुस्तकाची किंमत १.५




दशलक्ष डॉलर म्हणजे जवळपास ११ कोटी रुपयांहून अधिक होती. त्यामुळे इच्छुकांना हे पुस्तक खरेदी करणे सोपे नव्हते. मात्र रसेल यांनी हार मानली नाही. त्यांनी तब्बल एक महिना विक्रेत्याचा पिच्छा सोडलाच नाही. शेवटी त्याने तडजोड केली; पण पत्नीला कसे तयार करावे हा मोठा प्रश्न होता. ११ कोटी रुपये मोजून पुस्तक खरेदी करणे हा निश्चितच व्यवहारी विचार नव्हता. पण त्याने पत्नीला पण तयार केले. तसेच खासगी विमानाने पुस्तक घरी आणले.

रसेल हे उद्योगपती आहेत. त्यांच्याकडे नेपोलियन हिलच्या पुस्तकांचा मोठा संच आहे. त्यांनी अनेक पुस्तकं खरेदी केली आहेत. ११ कोटी रुपये खर्चून पुस्तक आणायचे तर मग कारने कशाला जायचे, विमानाने जाऊ या; यामुळे पुस्तकाला धूळ-माती सुद्धा लागणार नाही, असा विचार रसेल यांनी केला आणि खासगी विमानाने ते पुस्तक घेऊन आले.

## लोकलमध्ये अश्लील डान्स

लोकलमधून रोज लाखो मुंबईकर प्रवास करत असतात. गर्दीत प्रवास करत घर ते ऑफिस आणि ऑफिस ते घर गाठत असतात. याच लोकलमध्ये कायदेशीर नियमांची पायमल्ली करत अलिकडेच भोजपुरी गाण्यावर डान्स करण्यात आला. व्यावसायिक डान्सरने केलेले अश्लील नृत्य पाहून नेटकऱ्यांनी संताप व्यक्त केला आहे. ही मुंबईतील संस्कृती नाही, ही परप्रातीयांनी मुंबईच्या संस्कृतीची लावलेली वाट आहे, अशा प्रतिक्रिया उमटू लागल्या.

दिल्लीतील मेट्रोमध्ये डान्स आणि प्रेम प्रकरणाची अनेक प्रकरणे घडली आहेत. त्यासंदर्भातील व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाले. आता दिल्ली



मेट्रोनंतर मुंबईतील लोकलमध्ये डान्स करण्यात आला. ही मुलगी व्यावसायिक डान्सर आहे. तिचा डान्स पाहून प्रवाशांना अस्वस्थ वाटले. अश्लील कपडे परिधान करत डान्स करणाऱ्या मुलीवर कारवाईची मागणी नेटकरी करत आहेत.

मुलीच्या डान्सवर मुंबईकरांनी अनेक प्रश्न उपस्थित केला आहे. आता तुम्ही लोकलमध्ये शांतपणे प्रवास करू शकत नाही, असे काही युजर्सने म्हटले आहे. लोकलमध्ये कधी सामानांची विक्री करणारे विक्रेते येतात तर कधी भिकारी येतात. आता रील बनवणारेही येऊ लागले आहेत, अशा प्रतिक्रिया बऱ्याच प्रवाशांनी दिल्या. मुंबई लोकलमध्ये डान्स करणाऱ्या युवतीचे इन्स्टाग्रामवर पाच लाखांपेक्षा जास्त फॉलोअर्स आहेत. तिने केलेल्या या प्रकारामुळे नेटकरी भडकले आहे. असे पुन्हा होऊ नये, हीच अपेक्षा प्रवासी व्यक्त करत आहेत.

हे दैनिक जनता आवाज मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक अजित रमेश मोरे यांनी जनता आवाज प्रेस गट नं. २५/१/२/३, कोल्हार बु., ता. राहाता, जि. अहिल्यानगर ४१३७१० येथे छापून दैनिक 'जनता आवाज', मु.पो. कोल्हार बु., ता. राहाता जि. अहिल्यानगर, ४१३७१० जिल्हा कार्यालय- गाळा नं.१, विवेकानंद पॅलेस, श्रीराम चौक, बोल्हेगाव, अहिल्यानगर ४१४१११. (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. विभागीय कार्यालय- जिजामाता चौक, सोमैय्या हायस्कूल शेजारी, व्यापारी संकुल बिल्डींग, दुसरा मजला, ता. श्रीरामपूर, जिल्हा अहिल्यानगर, ४१३ ७०९, ✻ कार्य. संपादक : महेश पोपट रक्ताटे. पोस्टल परवाना क्र. SRP/141/2025-2028/ PRGI No. MHMAR/25/RAA11.
This daily Janta Awaj is published by Ajit Ramesh More, owner, printer, publisher and editor at Janta Awaj Press Gut No. 25/1/2/3, Kolhar Bk., Tal.- Rahata, Dist.- Ahilyanagar-413710. Published at District Office- Shop No.1, Vivekanand Palace, Shriram Chowk, Bolhegaon, Ahilyanagar-414111. Divisional Office-Jijamata Chowk, Near Somaiyya High School, Business Complex Building, 2nd Floor, Tal.-Shrirampur, Dist. -Ahilyanagar-413709
* Executive Editor- Mahesh Popat Raktate. Postal License Number-SRP/141/2025-2028 PRGI No.- MHMAR/25/RAA11